RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

प्रकाश आंबेडकरांना वेगळा प्रस्ताव जाणार नाही- संजय राऊत

पान २ पाहा

मराठी
# अक्रॉस मुंबई
संपादक- संजय मंगेश भैरे

सार्वत्रिक लोकसभा निवडणुक-2024 च्या अनुषंगाने पूर्वतयारीचा मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य श्रीकांत देशपांडे यांनी घेतला आढावा

पान २ पाहा

वर्ष: ९ अंक : १७ ■ मुंबई, मंगळवार १९ ते २५ मार्च '२४
मूल्य - ५.०० रुपये पाने - ८

# ईव्हीएमशिवाय नरेंद्र मोदी निवडणूक जिंकू शकत नाही- राहुल गांधी



■ मुंबई

: महात्मा गांधी यांनी मुंबईतूनच ब्रिटिशांना 'चले जाव' असे बजावले होते. त्याच मुंबईतून आता 'मोदी सरकार चले जाव' असा नारा देण्यात येत असल्याची घोषणा 'इंडिया' आघाडीच्या नेत्यांनी केली. राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो न्याय यात्रे'च्या समारोप रविवारी शिवाजी पार्क येथील सभेने झाला. लोकसभा निवडणुका जाहीर झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी झालेल्या सभेत आघाडीच्या नेत्यांनी निवडणूक प्रचाराचे रणशिंग फुंकले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केवळ एक मुखवटा आहेत. ते आपले लक्ष विचलित करण्याचे काम करतात, देशाच्या व्यवस्था नियंत्रित करणारी शक्ती वेगळी आहे. मोदी आणि त्यांच्या पाठिशी असलेल्या अदानी व इतर मूठभर उद्योगपतींनी लूटमार चालवली असल्याचा आरोप त्यांनी केला. गांधी म्हणाले की, भारत जोडो यात्रा माझी एकटयाची नाही, इंडिया आघाडीचे सगळे नेते-कार्यकर्ते त्यात सहभागी होते. देशाची जनसंपर्काची माध्यमे देशाच्या हातात राहिली नाहीत. त्यामुळे शेतकरी, युवा, महिलांचे प्रश्न, बेजोगारी, महागाई हे मुद्दे लोकांसमोर मांडण्यासाठी आपण कन्याकुमारी ते काश्मीर आणि मणिपूर ते मुंबई यात्रा काढल्याचे ते म्हणाले.

एका उद्योगपतीकडील विवाहासाठी विमानतळाला तात्काळ आंतरराष्ट्रीय दर्जा देण्यात आला. मात्र गोरगरीबांसाठी सरकार असे तात्काळ निर्णय कधी घेत नाही, असा आरोप राहुल गांधी यांनी अंबानी यांचे नाव न घेता केला. मतदान यंत्राशिवाय मोदी कदापिही निवडणुका जिंकू शकत नाहीत. व्हीव्ही पॅटच्या चिठ्ठ्यंची मोजणी करावी, ही आमची मागणी आहे. पण निवडणूक आयोग याला का तयार नाही, असा सवालही राहुल गांधी यांनी केला. निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून मोदी यांनी भ्रष्टाचार केल्याचा आरोप त्यांनी केला. रस्त्यावरची हप्तेवसुली त्यांनी देशपातळीवर नेली असा घणाघात करताना कंपन्यांना कंत्राटे देऊन, सीबीआय, ईडी चौकशीची भीती दाखवून पैशांची लूट केल्याचा त्यांचा आरोप आहे. या सभेला काँग्रेस पक्षाध्यक्ष मल्लीकार्जुन खरगे, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, तमिळनाडूचे मुख्यमंत्री व द्रमुकचे नेते स्टॅलिन, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर, काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी, नॅशनल कॉन्फरन्सचे नेते डॉ. फारुक अब्दुल्ला, झारखंडचे मुख्यमंत्री चंपाई सोरेन, राजद नेते तेजस्वी यादव, 'आप'चे सौरभ भारद्वाज, पीडीपी नेत्या मेहबुबा मुफ्ती, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी, हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखिवदरसिंह सुक्खू आदी उपस्थित होते.

भूसंपादन कायद्याला विरोध करू नये, यासाठी तत्कालिन मंत्री अरुण जेटली माझी भेट घेण्यासाठी निवासस्थानी आले होते. विरोधात बोलल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा देण्यात आला होता. मात्र आपण सरकारविरोधात बोलत राहिलो. उद्योगपतींच्या फायद्यासाठी भूसंपादन कायद्याची मोदी सरकारला घाई झाली होती. काँग्रेसने लोकांच्या बाजूने उभा राहिला. त्याची किंमत आपल्याला चुकवावी लागली. त्यानंतर ईडीने ५० तास बसवून आपली चौकशी केली. त्यावेळी ईडीचा एक अधिकारी केवळ आपणच मोदींच्या विरोधात बोलू शकतो, असे म्हणाल्याची आठवणही राहुल गांधी यांनी सांगितली. आम्ही 'इंडिया' आघाडी म्हणून भाजपाच्या विरोधात लढत आहोत, हे खरे नाही. नरेंद्र मोदी केवळ मुखवटा आहेत. मोदी ५६ इंच छातीचे नाहीत. ती पोकळ व्यक्ती आहे. त्यांच्यामागे असलेल्या शक्तीच्या विरोधात आमची लढाई आहे.

## अबकी बार भाजप तडीपार; शिवाजी पार्क येथील सभेत उद्धव ठाकरे यांचा नारा



लोकसभा निवडणुकीत यावेळी भाजपने चारशे पारची घोषणा केली आहे. पण भाजप हा नुसता फुगा आहे. त्यात आम्ही हवा भरली आहे, असे सांगत अबकी बार भाजप तडीपार ,असा नारा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला.राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेच्या समारोपप्रसंगी शिवाजी पार्कमध्ये आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत इंडिया आघाडीचे नेते उपस्थित होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार टीका केली. राहुल यांच्या भाषणापूर्वी उद्धव यांचे भाषण झाले. ते म्हणाले, आम्हाला ते विरोधकांची आघाडी असे भाजपवाले म्हणतात. खरे आहे. आम्ही विरोधक आहोत, पण त्या हुकूमशहांचे विरोधक आहोत. जेव्हा जनता एकवटते तेव्हा तेव्हा हुकूमशहांचा अंत होतो. 'फोडा अन् झोडा निती' असणाऱ्या भाजपला तोडायची आज आम्ही शिवाजी पार्कवर शपथ घेत आहोत. शिवाजी पार्कवर घेतलेल्या शपथा खऱ्या झाल्याचा इतिहास आहे, असा गर्भित इशारा उद्धव यांनी दिला. परिवाराच्या गोष्टी करता पण तुम्हाला परिवारच नाही. खुर्ची हाच तुमचा परिवार आहे. व्यक्ती देशावरूनी ओळखला जायला हवा. पण आता देश व्यक्तीने ओळखला जावा, अशी पद्धती आणली जात आहे. आम्ही कुणा एका व्यक्तीला विरोध करण्यासाठी इथे एकवटलेला नसून लोकशाही वाचवण्यासाठी आमची लढाई आहे, असे उद्धव यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले. हीच ती मुंबई आहे, ज्या मुंबईच्या भूमीवर ब्रिटिशांना चले जाव म्हटले होते. आज आम्ही त्याच मुंबईतून लोकशाहीला नख लावणाऱ्यांना चले जाव म्हणत आहोत. रशियात निवडणुका चालू आहेत, मात्र तेथे विरोधकच नाहीत. सगळे तुरुंगात आहेत. तसे आपल्या देशात चालू आहे, असा आरोप उद्धव यांनी केला. पक्षात तुम्ही आमच्यातील अनेकांना घेतले आहे. पण ती काही जनता नाही. फोडा अन् झोडा असे तुमचे धोरण असेल तर अशांना तोडा अन् छाताडावर राज्य करा, असे आमचे धोरण राहील, या शब्दात उद्धव यांनी भाजपला ठणकावले.

### भाजप सरकारचे आश्वासनांकडे दुर्लक्ष- शरद पवार

मुंबई शहरातून इंग्रजांना 'चले जाव'चा इशारा देण्यात आला होता. त्याच शहरातून आम्ही आता भाजपला 'चले जाव'चा नारा देत आहोत, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांनी सांगितले. निवडणुकीपूर्वी भाजपने नागरिकांना भरभरून आश्वासने दिली होती. पण या आश्वासनांची पूर्तता झालेली नाही. त्यात शेतकरी, युवकांना देण्यात आलेल्या आश्वासनांची समावेश आहे. देशातील सरकार बदलावे लागणार आहे. त्यासाठीच ही लढाई असल्याचे पवार म्हणाले.

## राहुल गांधींच्या 'त्या' विधानावर अशोक चव्हाणांचे स्पष्टीकरण

राहुल गांधी यांनी यावेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि खासदार अशोक चव्हाण यांचे नाव न घेता त्यांनी केंद्रीय तपास यंत्रणांपासून वाचण्यासाठी पक्ष सोडल्याचे म्हटलं आहे. राहुल गांधी यांच्याआधी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही अशोक चव्हाणांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली होती. त्यावर खासदार अशोक चव्हाण यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. राहुल गांधी यांनी माझ्याबाबत वक्तव्य केले असेल तर ते हास्यास्पद आणि तर्कहीन आहे, अशी प्रतिक्रिया खासदार अशोक चव्हाण यांनी दिली आहे. मी कधीही सोनिया गांधी यांना भेटलो नाही, माझे काही म्हणणे मांडले नाही असे अशोक चव्हाण यांनी म्हटलं आहे. अशोक चव्हाण काँग्रेस सोडण्यापूर्वी सोनिया गांधी यांच्या समोर रडले होते, माझ्यात या लोकांसोबत लढण्याची, जेलमध्ये जाण्याची ताकद नाही असे वक्तव्य राहुल गांधी यांनी केले होते. त्यावर अशोक चव्हाण यांनी हे प्रत्युत्तर दिलं.

## महाराष्ट्रात लिडर नाही डीलर, मोदी खोटारडेपणाची फॅक्टरी

### तेजस्वी यादवांचा हल्लाबोल



शिवाजी पार्कवर बोलताना तेजस्वी यादव यांनी जोरदार भाषण केलं अन् भाजपवर हल्लाबोल केला. त्यावेळी त्यांनी भाजप नेत्यांचा खरपूस समाचार घेतला. महाराष्ट्रात लिडर नाहीत तर डीलर आहेत. घाबरलेलले लोक गेले त्याने काही फरक पडत नाही, असं तेजस्वी यादव यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्रात फक्त आमदार पळवून नेलंय, पण बिहारमध्ये आमच्या चाचाला पळवून नेलंय. माझे काका पुन्हा पलटणार नाहीत याची मोदींनी गॅरंटी द्यावी, असा घणाघात तेजस्वी यादव यांनी केला. भाजपच्या लोकांना शेण पण हलवा म्हणून खायला घालतात. मोदी म्हणजे खोटारडेपणाची फॅक्टरी असल्याची टीका तेजस्वी यादव यांनी केली.

# माझ्यासाठी, प्रत्येक आई आणि मुलगी शक्तीचे स्वरूप -पंतप्रधान मोदी

**जगतियाल (तेलंगाना)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज (18 मार्च) तेलंगणा, कर्नाटक आणि तामिळनाडू या तीन राज्यांच्या दौऱ्यावर आहेत. तेलंगणातील जगतियाल येथे जाहीर सभेला संबोधित करताना त्यांनी 17 मार्च रोजी होणाऱ्या INDI अलायन्सच्या रॅलीला प्रतिसाद दिला.



मोदी म्हणाले- मुंबईतील INDI अलायन्सच्या रॅलीत त्यांनी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला, ज्यामध्ये त्यांचा लढा शक्तीविरुद्ध असल्याचे म्हटले आहे. माझ्यासाठी प्रत्येक आई आणि मुलगी ही शक्तीची रूपे आहेत. मी त्यांची शक्ती म्हणून पूजा करतो आणि त्यांचे रक्षण करण्यासाठी माझा जीव धोक्यात घालतो.

याशिवाय मोदींनी तेलंगणातील भारतीय राष्ट्र समिती (BRS) आणि काँग्रेसवर घराणेशाहीचा आरोप केला. मोदी म्हणाले- तेलंगणातून लुटलेला पैसा दिल्लीतील कुटुंबीयांच्या तिजोरीत जातो. मोदी त्यांना सोडणार नाहीत.

तेलंगणाच्या जगतियालनंतर पीएम मोदी कर्नाटकात जाणार आहेत. दुपारी 3.15 वाजता ते शिवमोग्गा येथे सभेला संबोधित करतील. यानंतर, संध्याकाळी ते तामिळनाडूतील कोईम्बतूरमध्ये 4 किमी लांबीचा रोड शोदेखील काढतील.

पंतप्रधान म्हणाले- काल मुंबईत इंडी अलायन्सची रॅली होती. निवडणुका जाहीर झाल्यानंतर भारतीय आघाडीची ही पहिलीच रॅली होती आणि त्यांच्यासाठी सर्वात महत्त्वाची होती. त्या रॅलीत त्यांनी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आणि आपला (इंडी अलायन्स) लढा शक्तीच्या विरोधात असल्याचे त्यांच्या जाहीरनाम्यात जाहीर केले. आपण सर्व शक्तीची उपासना करतो. चांद्रयानाच्या यशाला आम्ही शिवशक्ती असे नाव देऊन शक्तीला समर्पित केले आहे. एकीकडे शक्तीच्या नाशाच्या गप्पा मारणारे लोक आहेत. दुसरीकडे शक्तीची उपासना करणारे लोक आहेत. शक्तीचा नाश कोण करू शकतो आणि शक्तीचा आशीर्वाद कोणाला मिळू शकतो याची निकाल 4 जून रोजी होणार आहे.

# "हिंदू धर्माची शक्ती संपवण्याची ताकद त्यांच्याकडे आहे का?"

## एकनाथ शिंदेंचा राहुल गांधींना सवाल

■ **मुंबई**

काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेची सांगता रविवारी संध्याकाळी मुंबईत झालेल्या सभेने झाली. यावेळी उद्धव ठाकरे, एम. के. स्टॅलिन, फारुख अब्दुल्ला अशी महाविकास आघाडीतील मोठी नेतेमंडळी उपस्थित होती. त्यांच्या भाषणांच्या माध्यमातून त्यांनी भाजपाप्रणीत राज्य सरकार व केंद्र सरकारवर परखड शब्दांत टीकास्त्र सोडलं. या सभेवरून आज दिवसभर राजकीय वर्तुळात प्रतिक्रिया उमटत असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी दुपारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत राहुल गांधी व उद्धव ठाकरे यांना खोचक शब्दांत लक्ष्य केलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी रविवारी झालेली सभा म्हणजे फॅमिली गॅदरिंग असल्याचं म्हटलं आहे. "कालची सभा म्हणजे फॅमिली गॅदरिंग होती. भानुमती का कुणबा, कहीं से इंटे, कहीं से रोडे अशी म्हण आहे. सगळे नैराश्य चेहऱ्यावर असलेले लोक तिथे होते. उत्तर प्रदेश, बिहारमधून तडीपार, हद्दपार झालेले लोक तिथे आले होते. त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं की पकडून आणलेले लोक तिथे होते. हे दुर्दैवी आहे", असं एकनाथ शिंदे म्हणाले.



रम्यान, यावेळी एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंचं नाव न घेता अप्रत्यक्षपणे त्यांना लक्ष्य केलं. "स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या व बाळासाहेबांच्या स्मारकासमोर ही सभा झाली. उबाठाच्या लोकांनी आधी त्या समाधीवर जाऊन माफी मागायला हवी होती. सावरकरांच्या विरोधात बोलणाऱ्यांबरोबर, सनातन धर्माचा अवमान करणाऱ्यांबरोबर बसावं लागतंय. फारूख अब्दुल्लांबरोबर बसावं लागतंय. त्यासाठी त्यांनी माफी मागितली पाहिजे", असं ते म्हणाले. "उद्धव ठाकरेंचा एक शब्द बंद झाला. 'माझ्या तमाम हिंदू बांधव-भगिनींनो'. यावरून लक्षात आलं की बाळासाहेब ठाकरेंचे विचार, त्यांची भूमिका, धोरण हे सगळं त्यांनी सोडलं आहे. म्हणून तर आम्हाला त्यांना सोडण्याचा निर्णय घ्यावा लागला. अब की बार, तडीपार असं काल दिसत होतं. इतर राज्यांतून तडीपार झालेले लोक मोदींना तडीपार कसं करू शकतात?" असा खोचक सवाल एकनाथ शिंदेंनी केला.

# आयुक्त इकबाल सिंह चहल यांना पदावरून हटवले, बदली रोखण्याची राज्य सरकारची मागणी फेटाळली

■ **मुंबई**

मुंबई महापालिका आयुक्त इक्बालसिंग चहल यांची बदली रोखण्यासाठी महापालिका आयुक्तांना तीन वर्षांचा निकष लागू करू नये म्हणून राज्य सरकारने केलेली मागणी निवडणूक आयोगाने दुसऱ्यांदा सोमवारी फेटाळली. निवडणूक आयोगानेच चहल यांना पदावरून हटवले आहे. तशी घोषणा नुकतीच करण्यात आली आहे.

तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ पदावर असलेल्या महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्तांच्या बदल्या करण्याचा आदेश निवडणूक आयोगाने फेब्रुवारी अखेरीस दिला होता. या आदेशामुळे चहल यांच्यासह काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या कराव्या लागणार होत्या. थेट निवडणूक प्रक्रियेत सहभागी नसल्याने आयुक्त व अतिरिक्त आयुक्तांना आदेशातून वगळावे, अशी विनंती करणारे पत्र राज्य सरकारने निवडणूक आयोगाला पाठविले होते. मात्र आयोगाने सरकारची ही विनंती फेटाळून लावली होती.

तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ पदावर असलेल्या महानगरपालिका आयुक्त किंवा अतिरिक्त आयुक्तांची बदली करावीच लागेल, असे स्पष्ट आदेश निवडणूक आयोगाने दिले होते. मात्र राज्य सरकारने त्यावर काहीही कारवाई न करता पुन्हा ही बदली रोखण्यासाठी पत्र लिहिले होते. ती मागणी फेटाळून राज्य सरकारने आता थेट चहल यांना पदावरून हटवले आहे.



मुंबई महापालिकेचे आयुक्त इकबलसिंह चहल यांच्यासह अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे व पी वेलारासू यांचीही बदली करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने फेब्रुवारी अखेर दिले होते. मात्र त्यावरही काहीही निर्णय राज्य सरकारने घेतला नाही. भिडे यांच्याकडे सागरी किनारा मार्गाची जबाबदारी आहे, तर वेलरासू यांच्याकडे रस्ते काँक्रिटीकरण, गोरेगाव मुलुंड जोडरस्ता, नि:क्षारीकरण प्रकल्प असे सगळेच महत्वाचे प्रकल्प आहेत. मात्र आता या दोन अतिरिक्त आयुक्तांची बदली कधी होणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

इकबाल सिंह चहल यांनी मे २०२० मध्ये करोना काळात टाळेबंदी असताना मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला होता. त्यापूर्वीचे आयुक्त प्रवीण परदेशी यांची तत्कालीन राज्य सरकारने तडकाफडकी बदली केली होती. टाळेबंदीच्या काळात चहल यांनी रात्रीच पदभार स्वीकारला होता.



## निवडणुकीची रणधुमाळी सुरु...

# देशभरात सात टप्प्यात तर महाराष्ट्रात पाच टप्प्यांमध्ये मतदान

**प्रतिनिधी**

■ **नवी दिल्ली**

देशात 18 व्या लोकसभेसाठी निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर झाला. सर्व राज्ये व केंद्रशासीत प्रदेशांमध्ये दिनांक 19 एप्रिल ते 1 जून 2024 या कालावधीत एकूण सात टप्प्यांमध्ये मतदान पार पडणार असून 4 जून 2024 रोजी निवडणुकीचा अंतिम निकाल जाहीर होणार आहे. महाराष्ट्रात 19 एप्रिल ते 20 मे दरम्यान पहिल्या ५ टप्प्यांमध्ये निवडणुका घेण्यात येणार आहेत. तसेच विधानसभेच्या अकोला पश्चिम मतदारसंघासाठी लोकसभेच्या निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यात 26 एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्यावतीने येथील विज्ञान भवनात आज पत्रकार परिषद घेवून 18 व्या लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला.



4 जूनला मतमोजणी

मुख्य निवडणूक अधिकारी राजीव कुमार यांनी हा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि डॉ.सुखबीर सिंह संधू यावेळी उपस्थित होते. निवडणूक कार्यक्रमांच्या या घोषणेमुळे देशात आजपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

महाराष्ट्रातील 48 लोकसभा जागांसाठी एकूण पाच टप्प्यांमध्ये मतदान घेण्यात येणार आहे. 19 एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यात राज्यातील एकूण 5 लोकसभा मतदारसंघांसाठी निवडणुका पार पडणार आहेत. दुस-या टप्प्यात 26 एप्रिल रोजी राज्यातील 8 मतदारसंघांसाठी निवडणुका घेण्यात येणार आहेत. 7 मे रोजी तिस-या टप्प्यात राज्यातील एकूण 11 मतदारसंघांसाठी, 13 मे रोजी चौथ्या टप्प्यात तर 20 मे रोजी राज्यातील उर्वरित 13 मतदार संघांसाठी निवडणूक घेण्यात येणार आहे.

### महाराष्ट्रात मतदान कधी आणि कुठे ?

- ***पहिला टप्पा - 19 एप्रिल*** *- रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदीया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर*
- ***दुसरा टप्पा 26 एप्रिल*** *- बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ - वाशिम, हिंगोली, नांदेड, परभणी*
- ***तिसरा टप्पा 7 मे*** *- रायगड, बारामती, धाराशीव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले*
- ***चौथा टप्पा 13 मे*** *- नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरुर, अहिल्या नगर, शिर्डी, बीड*
- ***पाचवा टप्पा 20 मे*** *- धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, मुंबईतील सहा मतदारसंघ*

लोकसभा निवडणुकांबरोबरच देशातील विधानसभांच्या 26 जागांसाठी पोट निवडणुका होत असून यात महाराष्ट्रातील अकोला पश्चिम मतदारसंघासाठी लोकसभेच्या निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यात 26 एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

देशात 19 एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यात 21 राज्य व केंद्रशासीत प्रदेशांमध्ये एकूण 102 लोकसभा मतदारसंघांसाठी मतदान घेण्यात येणार आहे. यासाठी 20 मार्च रोजी अधिसूचना जारी होणार आहे. 27 मार्च ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख असेल तर 28 मार्च रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. तर 30 मार्च ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. देशात 26 एप्रिल रोजी दुस-या टप्प्यात 13 राज्य व केंद्रशासीत प्रदेशांमध्ये एकूण 89 लोकसभा मतदारसंघांसाठी मतदान घेण्यात येणार आहे. यासाठी 28 मार्च रोजी अधिसूचना जारी होणार आहे. 4 एप्रिल ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख असेल तर 5 एप्रिल रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. तर 8 एप्रिल ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. देशात 7 मे रोजी तिस-या टप्प्यात 12 राज्य व केंद्रशासीत प्रदेशांमध्ये एकूण 94 लोकसभा मतदारसंघांसाठी मतदान घेण्यात येणार आहे. यासाठी १२ एप्रिल रोजी अधिसूचना जारी होणार आहे. देशात 13 मे रोजी चौथ्या टप्प्यात 10 राज्य व केंद्रशासीत प्रदेशांमध्ये एकूण 96 लोकसभा मतदारसंघांसाठी मतदान घेण्यात येणार आहे. यासाठी १८ एप्रिल रोजी अधिसूचना जारी होणार आहे. देशात 20 मे रोजी पाचव्या टप्प्यात 8 राज्य व केंद्रशासीत प्रदेशांमध्ये एकूण 49 लोकसभा मतदारसंघांसाठी मतदान घेण्यात येणार आहे. यासाठी ३ मे रोजी अधिसूचना जारी होणार आहे. देशात 25 मे रोजी सहाव्या टप्प्यात 7 राज्य व केंद्रशासीत प्रदेशांमध्ये एकूण 57 लोकसभा मतदारसंघांसाठी मतदान घेण्यात येणार आहे. यासाठी २९ एप्रिल रोजी अधिसूचना जारी होणार आहे. देशात 1 जून रोजी सातव्या टप्प्यात 8 राज्य व केंद्रशासीत प्रदेशांमध्ये एकूण 57 लोकसभा मतदारसंघांसाठी मतदान घेण्यात येणार आहे. यासाठी ७ मे रोजी अधिसूचना जारी होणार आहे.

**निवडणूक यंत्रणेसमोर चार आव्हाने**

आदर्श आचार संहितेचे उल्लंघन केल्यास बळाचा प्रयोग(मसल पावर), पैशांचा वापर (मनी पावर), चुकीची माहिती(मिस इन्फॉर्मेशन) आणि माध्यम समन्वय समितीच्या नियमांचे उल्लंघन ही निवडणूक यंत्रणेसमोरील महत्वाची आव्हाण असून यावर मात करण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्याचेही राजीव कुमार यांनी यावेळी सांगितले.

मराठी अक्रॉस मुंबई

# प्रकाश आंबेडकरांना वेगळा प्रस्ताव जाणार नाही

## मविआ लोकसभा निवडणूक जागावाटपाबद्दल राऊत स्पष्टच बोलले

प्रतिनिधी

■ मुंबई

'प्रकाश आंबेडकरांना वेगळा प्रस्ताव जाणार नाही. आता जो प्रस्ताव आहे त्यावरच प्रकाश आंबेडकर चर्चा करतील', असं ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत म्हणाले आहेत. देशात लोकसभा निवडणूक जाहीर झाली आहे. असं असलं तरी अद्याप महाविकास आघाडीचा लोकसभा निवडणुकीचा जागावाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. यातच महाविकास आघाडीने वंचित बहुजन आघाडीला चार जागेचा प्रस्ताव दिला आहे. यावरच माध्यमांशी बोलताना राऊत असं म्हणाले आहेत.





लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यावर संजय राऊत म्हणाले आहेत की, "निवडणूक जाहीर झाल्याचं आम्ही संगत करतो. आम्ही परिवर्तनचा चंग मांडला आहे. आम्ही आमचा निर्धार पूर्ण करू. निवडणूक आयोग दबावदवाखाली काम करतोय, असा संशय निर्माण लोक करतात. हे निरसण आयोगाने करावे. लोक साशांक आहेत."

ते म्हणाले, "मोदी आणि निवडणूक आयोग हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मोदी याची गॅरंटी घेणार का निवडणूक पारदर्शक पणे होईल." राऊत म्हणाले, "महाविकास आघाडीमध्ये सगळं ऑल इज वेल आहे. मित्र पक्षांसोबत बोलणी सुरु आहे. वंचितला ४ जागेचा प्रस्ताव दिला आहे."

दरम्यान, याच मुद्द्यावर बोलताना वचिंत बहुजन आघाडीचे प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे म्हणाले होते की, "महाविकास आघाडीने अकोला व्यतिरिक्त ज्या दोन जागांचा प्रस्ताव दिला आहे, तो वंचित बहुजन आघाडीच्या राज्य कार्यकारिणीने एकमताने फेटाळला आहे. अकोल्याची जागा सोडण्याची तयारी आम्ही दाखवली होती, तरी आम्हाला हरणाऱ्या दोन जागा ज्या दिलेल्या आहेत. त्या आम्हाला नको."

मोकळे म्हणाले होते की, "मविआच्या बैठका होत आहेत. त्या बैठकांना आम्हाला बोलावत नव्हते, २ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी या दरम्यान झालेल्या कोणत्याही बैठकीत आम्हाला बोलावलं नाही. शेवटची बैठक ही ६ मार्च रोजी झाली, आज १५ मार्च आहे. अद्याप कोणताही संवाद महाविकास आघाडीच्या कोणत्याही पक्षाकडून आमच्याशी झालेला नाही. या पद्धतीची वागणूक वंचित बहुजन आघाडीला दिली जात आहे."

# कोस्टल रोडवरील 70 हेक्टर जमिनीवर हिरवाईसह आराखडा तयार

## प्रोमेनेडमध्ये 10 ठिकाणांहून सहज प्रवेश मिळेल

प्रतिनिधी

■ मुंबई

मुंबईत बांधण्यात येत असलेल्या कोस्टल रोडचा काही भाग सर्वसामान्यांसाठी खुला करण्यात आला आहे. कोस्टल रोडमधील भरावातून मिळालेल्या ७० हेक्टर जागेवर इंटरचेंजच्या खाली विहार, सायकल ट्रॅक, आंतर-कनेक्टेड रस्ता, मियावाकी जंगल, हिरवळ आणि सुशोभीकरण विकसित करण्याची योजना महापालिकेने कोस्टल रोड सल्लागार एफकॉनला दिली होती. गुरुवारी एफकॉनचे उपाध्यक्ष विपुल सुराणा यांनी महापालिका आयुक्त इक्बाल सिंग चहल, अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे आणि मुंबईतील अनेक वास्तुविशारदांच्या उपस्थितीत काल पालिका मुख्यालयात सादरीकरण केले. सादरीकरणानंतर आयुक्तांनी, ज्यांच्या सूचना व हरकती असतील त्यांनी त्या कराव्यात ईमेलवर त्या पाठवू शकता. असे सांगितले.

महापालिका मुख्यालयात सुमारे दीड तास हे सादरीकरण करण्यात आले. तेथे उपस्थित हाफिज कॉन्ट्रॅक्टरने डिझाइनवर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले की, विहाराच्या मार्गावर अधिक हिरवळ वाढवली पाहिजे. समुद्राच्या खाऱ्या पाण्यामुळे किनाऱ्यावर लावलेली झाडे वाढणार नाहीत. त्यामुळे स्थानिक झाडे लावावीत. ताडाची झाडे लावण्याची सूचनाही त्यांनी केली. कोस्टल रोड आणि इमारतींमधील रिकाम्या जागेत झाडांची संख्या वाढवावी, यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल आणि वाहनांच्या आवाजाचा रहिवाशांना कोणताही त्रास होणार नाही.

आराखड्यानुसार अमरसन्स इंटरचेंज येथे 3 एकर जागेवर 36 हजार झाडे लावण्यात येणार आहेत. एका मीटरवर तीन झाडे लावण्यात येणार आहेत. कोस्टल रोडच्या 10.58 किमी अंतरासाठी बांधण्यात आलेल्या फूटपाथवर आणखी 7500 झाडे लावण्यात येणार आहेत.

15 किमी लांबीचा सायकल ट्रॅक बांधला जाईल, 6.5 किमी लांबीची ब्लू लूप पार्क लाईन बांधली जाईल. 7.2 किमी नेचर केव्ह पर्पल लूप पेडेस्ट्रियन कल्चर टेरेस वॉक, 3.8 किमी लांबीचे ग्रीन लूप हेल्थ सर्किट, एज्युकेशन सर्किट, कम्फर्ट सर्किट पादचाऱ्यांसाठी बांधण्यात येणार आहे.

प्रोमेनेडची लांबी 10 किमी आहे, त्यामुळे लोकांना सहज ये-जा करण्यासाठी 10 ठिकाणी प्रवेश आणि बाहेर पडण्याची सुविधा देण्यात आली आहे.

# आदर्श आचारसंहितेचे सर्व सबधितांनी काटेकोरपणे पालन करावे – जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी संजय यादव

■ मुंबई

मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी आज (दिनांक १६ मार्च २०२४) पत्रकार परिषद घेऊन सार्वत्रिक लोकसभा निवडणूक - २०२४ ची घोषणा केली असून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. मुंबई शहर जिल्ह्यात ३०-मुंबई दक्षिण मध्य,व ३१- मुंबई दक्षिण हे दोन लोकसभा मतदारसंघ असून २४ लाख ४६ हजार ०८८ पात्र मतदार आहेत. मुंबई शहर जिल्ह्यात दिनांक २० मे २०२४ (सोमवार) रोजी पाचव्या टप्प्यात मतदान होणार असून दिनांक ४ जून २०२४ (मंगळवार) रोजी मतमोजणी होणार आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील सर्व पात्र मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी आज पत्रकार परिषदेत केले.

मुंबई शहर जिल्हा कार्यालय, नियोजन भवन, मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी माहिती दिली.

# मराठी माणुस हे फक्त नोकरी मागणारे हात न बनता नोकरी देणारे हात व्हवावे त्या दिशेने आपण काम केले पाहिजे

## उद्योग सेलचे प्रमुख उदय सावंताचे वक्तव्य

■ मुंबई

मी उद्योजक होणारच या व्यासपीठाच्या विद्यमाने महाराष्टातील मराठी माणसाला यशस्वी उद्योजक बनविण्यासाठी अनेक कार्यक्रम राबविले जातात. त्यानुषंगाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त षण्मुखानंद सभागृहात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.




त्याप्रसंगी महाराष्ट्र उद्योग सेलचे प्रमुख उदय सावंत उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले की केवळ मराठी उद्योजक या कार्यक्रमासाठी एकत्र येत आहेत, म्हणून कमी वेळ असतानासुद्धा उद्योगमंत्री या कार्यक्रमाला उपस्थित राहिले त्यासाठी सावंत यांनी मंत्री सामंत यांचे आभार मानले. पुढे बोलताना सावंत म्हणाले की उदय सामंत उद्योगमंत्री झाल्यापासून महाराष्ट्रात त्यांनी नवीन ऊर्जा, नवीन शक्ती व नवीन दूरदृष्टी महाराष्ट्र राज्याला उपलब्ध करून दिली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्यच्या उन्नती व आपल्या सर्वांच्या विकासासाठी अहोरात्र मेहनत करत आहेत त्यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योगमंत्री काम करत आहेत. तरी सुद्धा मागील ७० वर्षांमध्ये ज्याप्रकारे हवी आहे त्याप्रकारे मराठी माणसाची उद्योजकतेकडे वाटचाल झालेली नाहीत. त्यासाठी अनेक संस्था वेगवेगळे कार्यक्रम, शिबिरे आयोजित करत आहे. मराठी माणसाला उद्योग जगात प्रोत्साहन मिळावे यासाठी महाराष्ट्र राज्य सरकार नेहमीच कार्यरत आहेत. राज्यातील सरकार हे समाजातील सर्व घटकांना न्याय देणारे सरकार आहे. मराठी माणुस हे फक्त नोकरी मागणारे हात न बनता नोकरी देणारे हात कशा प्रकारे बनतील या बाबतीच आपण सर्वांनी वाचर केला पाहिजे. महाराष्ट्रात बाहेरून उद्योग आलेच पाहिजे पण त्या येणाऱ्या उद्योगांमध्ये मराठी माणसाला जास्तीत जास्त स्थान कसे मिळावे यासाठी आपण प्रामुख्याने प्रयत्न करवेत, अशी विनंती मी उद्योगमंत्र्यांना करतो, कारण जो पर्यंत राजाश्रय मिळत नाही तो पर्यंत आपण पुढे जाऊ शकत नाही, असेही उद्योग सेलचे प्रमुख उदय सावंत म्हणाले. नवीन मराठी उद्योजकांसाठी आमच्या संस्थेचा प्रत्येक उद्योजक नेहमीच आपल्या पाठीशी आहे, जेव्हाही गरज वाटत असेल तेव्हा फक्त तुम्ही हाक द्या आमच्या संस्थेतील प्रत्येक उद्योजक तुमच्या सोबत आहे, अशीही ग्वाही या प्रसंगी उदय सावंत यांनी दिली.

# महानगरपालिकेकडून मालमत्ता थकबाकीदारांची यादी जाहीर

## 'टॉप टेन' थकबाकीदारांकडे 147 कोटींची थकबाकी

प्रतिनिधी

■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेचा 'मालमत्ता कर' थकवणाऱ्या बड्या थकबाकीदारांविरोधात महानगरपालिका प्रशासनाने धडक कारवाई सुरु केली आहे. याअंतर्गत काल २४ प्रशासकीय विभागातील १४२ बड्या थकबाकीदारांकडे करनिर्धारण आणि संकलन खात्याने वसुली कामी पाठपुरावा केला. मालमत्ता कर थकबाकी असणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांची आकडेवारी देण्यात आली आहे. दहा मोठ्या थकबाकीदारांची महानगरपालिकेला देय असलेली थकबाकी ही सुमारे १४७ कोटी २४ लाख ७२ हजार १८ रूपये इतकी आहे.

त्यापैकी काही थकबाकीदारांनी धनादेश (चेक), धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) महानगरपालिका अधिका यांनकडेरयां अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केले आहे. नागरिकांनी थकीत मालमत्ता कर तातडीने महानगरपालिकेकडे जमा करावा, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

नागरिकांना विविध सेवा-सुविधा देणाऱ्या महानगरपालिकेचा 'मालमत्ता कर' हा उत्पन्नाचा महत्वाचा स्रोत आहे. सरत्या आर्थिक वर्षात मालमत्ता कर वसुलीचे लक्ष्य गाठण्यासाठी करनिर्धारण आणि संकलन खात्याने विविध उपाययोजना आखल्या आहेत. कर वसुलीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी करनिर्धारण आणि संकलन विभाग अथक कार्यरत आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ हे संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे थकबाकी वसुलीसाठी अतिशय सुक्ष्म पद्धतीने नियोजन करण्यात आले आहे.

मालमत्ता कराचे आर्थिक वर्ष २०२३ - २०२४ ची कर देयके फेब्रुवारी २०२४ अखेरीस निर्गमित झाल्यानंतर विभागीय स्तरावर कार्यालयीन दिवशी तसेच सुट्टीच्या दिवशी करदात्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन करवसुलीचे कामकाज सुरु आहे. समाज माध्यमांद्वारे संपर्क करुन तसेच गृहनिर्माण संस्थेतील सदनिकानिहाय करवसुलीचे कामकाज कार्यरत आहे. करदात्यांना करभरणा करण्याचे आवाहन मायकिंगद्वारे, दर्शनीय ठळक बॅनरद्वारे तसेच स्थानिक केबलद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे.

# सार्वत्रिक लोकसभा निवडणुक-2024 च्या अनुषंगाने पूर्वतयारीचा मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य श्रीकांत देशपांडे यांनी घेतला आढावा

■ सातारा

सार्वत्रिक लोकसभा निवडणुक-2024 च्या अनुषंगाने पूर्वतयारी बाबतचा आढावा अपर मुख्यसचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य श्रीकांत देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, उपायुक्त निलीमा धायगुडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे, पर्यवेक्षाधिन आयएएस अधिकारी श्री. चंद्रा यांच्यासह सातारा जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी यांनी आगामी निवडणूकीच्या अनुषंगाने मतदान केंद्रांची व्यवस्था, मनुष्यबळ व्यवस्था, मतदार नोंदणी, कायदा व सुव्यवस्था, प्रतिबंधात्मक कारवाई, दाखल गुन्हे, इ. बाबत सविस्तर सादरीकरण करणेत आले. या सादरीकरणाच्या वेळी अपर सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांनी सातारा जिल्हयातील निवडणूक पूर्वतयारी व कायदा व सुव्यवस्था बाबत समग्र व वस्तुस्थितीजन्य आढावा घेत ज्या बाबी निर्देशनास आल्या त्या मुद्यांवर जाणीवपूर्वक लक्ष देवून कार्यवाही करणे आवश्यक आहे या बाबत निर्देश व मार्गदर्शन केले.

अंतिम मतदार यादी

दिनांक 23 जानेवारी 2024 रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणेत आलेली आहे. यंदा राज्यात लोकसभा आणि विधानसभा या दोन महत्त्वाच्या निवडणुका घेण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात व सातारा जिल्ह्यात मतदार याद्यांच्या अद्ययावतीकरणासाठी विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम तसेच घरोघरी सर्वेक्षणाची मोहीम राबवण्यात आली होती. या विशेष संक्षिप्त कार्यक्रमात राबवण्यात आलेल्या मोहिमांमुळे अंतिम मतदार यादीत नवमतदारांचा टक्का लक्षणीय वाढला असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिली. निवडणुका पारदर्शक आणि न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण तसेच शुद्धीकरण अत्यंत महत्त्वपूर्ण असते. यासाठी भारत निवडणूक आयोगाकडून दरवर्षी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबवला जातो. २७ ऑक्टोबर २०२३ रोजी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर आणि सातारा जिल्हयातील मतदार नोंदणी कार्यालयांमध्ये प्रारूप यादी प्रकाशित करून २०२४च्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला होता. सदर कार्यक्रम २७ ऑक्टोबर ते २३ जानेवारी २०२४ या कालावधीत राबवला गेला. या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत *ऑक्टोबर २०२३ च्या प्रारूप मतदार यादीत 25,70,343 मतदारांमध्ये 108754 मतदारांची नाव नोंदणी झाली. तसेच 1,32,634 मतदारांची वगळणी करण्यात आली*. त्यामुळे अंतिम मतदार यादीमध्ये एकूण मतदारांची संख्या 25,46,463 इतकी झालेली आहे. त्यानुसार पुरुष मतदारांची संख्या 12,97,027 व श्री मतदारांची संख्या 12,49,345 आणि 91 तृतीयपंथी मतदारांची संख्या नोंदविणेत आलेली आहे. महिला बचत गट, अंगणवाडी सेविका, गृहनिर्माण सोसायट्या यांच्या सहकार्यामुळे यंदा महिलांच्या मतदार नोंदणीत लक्षणीय वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे मतदार यादीतील श्री-पुरुष गुणोत्तर 957 वरून 963 इतके झाले आहे.

या पुनरीक्षण कार्यक्रमामध्ये १८ ते १९ या वयोगटामध्ये 3392 मतदारांची नव्याने भर पडली आहे. तसेच २० ते २९ या वयोगटात 36984 मतदारांची वाढ झालेली आहे. प्रारूप यादीत १८ ते १९ या वयोगटाची मतदार संख्या 9205 (0.26 टक्के) होती.ती जानेवारीच्या अंतिम मतदार यादीत 43,127 (1.64 टक्के) इतकी झालेली आहे. तर २० ते २९ वयोगटाची प्रारूप यादीतील मतदार संख्या 403004 (11.20 टक्के) होती, ती अंतिम यादीत 4,39,988 (16.72 टक्के) इतकी झालेली आहे. विविध सामाजिक संस्था, महाविद्यालये यांनी राबवलेल्या मतदार नोंदणी शिबिरांमुळे या वयोगटाच्या टक्केवारीत वाढ झालेली दिसून येते. येत्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्या अचूक व परिपूर्ण असण्यावर भारत निवडणूक आयोगाचा भर आहे. त्यानुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमापूर्वी जुलै ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत घरोघरी सर्वेक्षणाची मोहीम राबवण्यात आली होती. सदर सर्वेक्षणात आढळलेल्या मृत मतदार, कायमस्वरूपी स्थलांतरित मतदार, तसेच दुबार मतदार यांची नावे मतदार यादीतून वगळण्याची कार्यवाही पुनरिक्षणपूर्व कालावधीत तसेच विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कालावधीत पूर्ण करण्यात आली. त्यानुसार 1,07,112 मृत मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली. त्यांपैकी ऐंशीपेक्षा अधिक वय असलेले 38,321 मतदार मृत झाले असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांची नावेही वगळण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे मतदार याद्यांमध्ये 23,927 एकसारखे फोटो असलेले मतदार (फोटो सिमिलर एन्ट्रीज PSE) असल्याचे निदर्शनास आले, त्यांची सखोल तपासणी करून विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कालावधीत 8767 मतदारांच्या नावांची वगळणी करण्यात आली आहे. तसेच मतदार यादीत नाव व इतर काही तपशील समान असलेले (डेमोग्राफिकल सिमिलर एन्ट्रीज DSE) 10353 मतदार आढळून आले. त्यांची सखोल तपासणी करून 3537 मतदारांची नावे वगळण्यात आलेली आहेत.

# शेतकऱ्यांना जीएसटीमधून वगळण्याचे गांधींचे आश्वासन

# हा देश शेतकऱ्यांचा...

## भाजपने शेतकऱ्यांची अवस्था केली बिकट : पवार

प्रतिनिधी

■ चांदवड

शेतकरी आपल्या मागण्यांसाठी दिलीच्या सीमेवर व रामलीला मैदानावर आंदोलन करत आहेत. हमी भावाचा कायदा करावा ही शेतकऱ्यांची मागणी आहे पण मोदी सरकार त्यांची दखल घेत नाही. मोदी सरकारने २२ अरबपतींचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ केले परंतु शेतकऱ्यांचे एक रुपयाचेही कर्ज माफ केले नाही. ज्यांना शेतकऱ्यांच्या कष्टाची जाणीव नाही, त्यांचे दुःख समजत नाही तो शेतकऱ्यांना मदत काय करणार? असा सवाल उपस्थित करत काँग्रेस सरकारचे व आपले दरवाजे सदैव शेतकरी व सर्वसामान्यांसाठी खुले असतील व




### चांदवडच्या मेळाव्यात शरद पवार व संजय राऊतांची उपस्थिती

इंडिया आघाडीचे सरकार आल्यावर शेतकऱ्यांना जीएसटीमधून वगळणार, पीक वीमा योजनेची पुनर्रचना करणार असे खासदार राहुल गांधी यांनी सांगितले.

भारत जोडो यात्रेदरम्यान चांदवड येथे शेतकरी मेळाव्याला राहुल गांधी संबोधित करत होते. राहुल गांधी पुढे म्हणाले की, देशात आज शेतकरी समस्या, बेरोजगारी, महागाई, भागिदारी हे मुळे मुद्दे आहेत पण जनतेच्या या मुद्द्यांपासून लक्ष दुसरीकडे वळवले जात आहे. पिक विमा योजनेचा फायदा केवळ कंपन्यांना होतो, शेतकऱ्यांचे नुकसान झाले तर त्यांना मदत मिळत नाही हे चित्र बदलण्याची गरज आहे, काँग्रेसचे सरकार आल्यानंतर पिक विमा योजनेची पुनर्रचना केली जाईल. आयात-निर्यात धोरणाचा फटका शेतकऱ्यांना बसणार नाही याची काळजी घेतली जाईल. शेतकऱ्यांवर जीएसटी लावलेला आहे त्याचा काँग्रेस सरकार विचार करुन शेततकऱ्यांना जीएसटीतून वगळण्याचा प्रयत्न करेल.

पान ३ वर...

# ममता बॅनर्जी जखमी

## घरात फिरत असताना तोंडावर पडल्या



■ कोलकाता

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी (70 वर्ष) घरात पडून गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांच्या कपाळावर गंभीर आणि खोल जखम झाल्याचे समजते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, ममता गुरुवारी कालीघाट येथील त्यांच्या घरात फिरत होत्या. त्यादरम्यान त्या पडल्या. चेहऱ्यावर पडल्याने त्यांच्या कपाळावर जखम झाली. घटनास्थळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी त्यांना घरात नेले. यानंतर पुतण्या अभिषेक बॅनर्जीने त्यांना रुग्णालयात दाखल केले. अपघाताचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. ममता त्यांच्या घरी ट्रेडमिलवरून पडल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये आणले, तेव्हा एक्सरसाइजच्या वेळी घातलेले कपडे त्यांनी घातले होते. खोलीत ठेवलेल्या कपाटावर त्यांचे डोके आदळल्याने त्यांच्या कपाळाला मार लागला असून त्या जखमी झाल्या आहेत.

# निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केला निवडणूक रोख्यांचा तपशील

■ नवी दिल्ली

सुप्रीम कोर्टाने फटकारल्यानंतर भारतीय स्टेट बँकने निवडणूक रोख्यांचा तपशील निवडणूक आयोगाकडे दिला होता. कोर्टाच्या आदेशानुसार निवडणूक आयोगाला हा तपशील उद्या १५ मार्चपर्यंत आपल्या वेबसाइटवर प्रसिद्ध करणे अनिवार्य होते. या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने आज सायंकाळीच निवडणूक रोख्यांबाबतचा तपशील आपल्या वेबसाइटवर प्रसिद्ध केला आहे. या तपशीलातून कोणत्या कंपनीने निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून कोणत्या राजकीय पक्षाला किती निधी दिला, याबाबतची माहिती समोर आली आहे. निवडणूक आयोगाने आपल्या वेबसाइटरवर प्रसिद्ध केलेल्या तपशीलामध्ये १२ एप्रिल २०१९ नंतरच्या १ हजार रुपयांपासून १ कोटी रुपयांच्या निवडणूक रोख्यांच्या खरेदीची माहिती आहे. यामध्ये कंपनी आणि व्यक्तींने केलेल्या खरेदीबाबत माहिती देण्यात आली आहे. निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून निधी मिळालेल्या पक्षांमध्ये भाजप, काँग्रेस, एआयडीएमके, बीआरएस, शिवसेना, टीडीपी, वायएसआर काँग्रेस आणि इतर राजकीय पक्षांचा समावेश असल्याचं या तपशीलातून दिसत आहे. निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून राजकीय पक्षांना निधी देणाऱ्या कंपन्यांमध्ये ग्रासिम इंडस्ट्रीज, मेघा इंजीनियरिंग, पीरामल एंटरप्राइजेज, टोरेंट पॉवर, भारती एयरटेल, डीएलएफ कमर्शियल डेव्हलपर्स, वेदांता लिमिटेड, अपोलो टायर्स, लक्ष्मी मित्तल, एडलवाइस, पीवीआर, केवेंटर, सुला वाइन, वेलस्पन, सन फार्मा या कंपन्यांचा समावेश आहे.

# 'एक राष्ट्र, एक निवडणुकी'बाबत कोविंद समितीचा अहवाल सादर



■ नवी दिल्ली

केंद्रातील मोदी सरकार एक राष्ट्र, एक निवडणूक घेण्याबाबत विचार करत आहे. अशातच या संकल्पनेवर अभ्यास करून त्याची अंमलबजावणी कशी करता येईल याबाबत अहवाल सादर करण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. या समितीने त्यांचा अहवाल विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू याच्याकडे सुपूर्द केला आहे. समितीने एक राष्ट्र, एक निवडणूक घेण्यासाठी संविधान संशोधन करण्याची शिफारस केली आहे. सरकारने एक कायदेशीर यंत्रणा तयार करावी, ज्याद्वारे देशभरात एकाच वेळी निवडणुका घेणं शक्य होईल, असे समितीने म्हटले आहे. समितीने तब्बल १८,६२६ पानांचा अहवाल सादर केला आहे.

# पेट्रोल-डीझेल दोन रुपयांनी स्वस्त

■ नवी दिल्ली

लोकसभा निवडणुकीपूर्वी गुरुवारी देशभरात पेट्रोल आणि डिझेल दोन रुपयांनी स्वस्त झाले. याआधी राजस्थान सरकारने आपल्या राज्यातील डिझेल आणि पेट्रोलवरील व्हॅट 2 टक्क्यांनी कमी केला आहे.

तेल विपणन कंपन्या सध्या पेट्रोल आणि डिझेलवर प्रति लिटर सुमारे 10 रुपये कमावत आहेत, जे ते ग्राहकांना देऊ शकतात. एप्रिल 2022 मध्ये तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत शेवटची कपात केली होती. इंडियन ऑइल



(IOC), भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन (BPCL) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन (HPCL) या तिन्ही ओएमसीमध्ये सरकार प्रवर्तक आणि बहुसंख्य भागधारक आहे. आतापर्यंत, 2023-24 च्या पहिल्या सहामाहीत तीन कंपन्यांचा एकत्रित निव्वळ नफा ₹57,091.87 कोटी आहे.




# इलोक्टोरल बाँड हे मोदींनी चालवलेले सर्वात मोठे वसुली रॅकेट - राहुल गांधी

## सीबीआय, ईडी, आयकर विभागाकडून दबाव टाकून कार्पोरेट्सकडून वसुली

**प्रतिनिधी**
**भिवंडी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजकीय अर्थकारण साफ करण्याची भाषा करून इलेक्टोरल बाँड पद्धत आणली पण या बाँडची खरी बाजू आज देशाला समजली आहे. इलोक्टोरोल बाँड हे जगातील सर्वात मोठे हप्तावसुली रॅकेट आहे आणि सीबीआय, ईडी, आयकर विभागाला यासाठी गुंतवून वसुली केली आहे. हिंदुस्थानच्या इतिहासातील या सर्वात मोठ्या भ्रष्टाचारात पंतप्रधान मोदींचा हात आहे, असा आरोप खासदार राहुल गांधी यांनी केला आहे.

भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान संध्याकाळी भिवंडी येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना राहुल गांधी यांनी या घोटाळयावरून भारतीय जनता पक्ष व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर चौफेर हल्ला केला. ते पुढे म्हणाले की, सीबीआय, ईडी,



आयकर विभागाकडून कार्पोरेट कंपन्यांवर दबाव टाकून ही वसुली करण्यात आलेली आहे. एखाद्या कंपनीवर सीबीआय ईडी किंवा आयकर विभागाची कारवाई होते त्यानंतर ती कंपनी बाँड खरेदी करते हे उघड झाले आहे. काही कंपन्यांना काम देऊन त्यातील हिस्सा या बाँडच्या माध्यमातून वसूल केला आहे. काही कंपन्यांना राष्ट्रीय महामार्ग, रस्ते, टनेलचे कंत्राट दिले त्या कंपन्यांकडूम मोठी वसुली केली आहे. हा गंभीर गुन्हेगारीचा प्रकार असून राष्ट्रद्रोह आहे. या घोटाळयात नितीन गडकरींचा सहभाग नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदींचाच हात आहे.

ईडी, सीबीआय, आयकर, निवडणूक आयोग या संस्थांना मोदींनी वसुलीच्या कामाला जुंपले आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात शेल कंपन्यांचा वापर केला आहे. सर्वच्या सर्व यंत्रणाच वसुलीच्या कामाला जुंपल्या आहेत. या संस्था भाजपा व आरएसएसच्या शस्त्र बनवल्या आहेत. परंतु भाजपाची कधीतरी सत्ता जाईल आणि त्यावेळी जी चौकशी होईल ती अत्यंत कठोर कारवाई असेल. काँग्रेससह विरोधी पक्षांनाही या बाँडचे पैसे मिळाले आहेत या प्रश्नावर बोलताना राहुल गांधी म्हणाले की, यातील सर्वात जास्त पैसा भाजपाला मिळालेला आहे. १०-२० टक्के पैसा विरोधी पक्षांना मिळाला असेल परंतु काँग्रेसकडे हायवे किंवा इतर कंत्राट देण्याचे अधिकार नाहीत. सीबीआय, ईडी, आयकर विभाग यांच्यावर विरोधी पक्षांचे नियंत्रण नाही ते या सर्व संस्था पंतप्रधानांच्या नियंत्रणात आहेत असे राहुल गांधी यांनी स्पष्ट केले.

# काँग्रेसकडे खर्चासाठी पैसे नाहीत, मोदी सरकार खाती गोठवतंय अशा परिस्थितीत निष्पक्ष निवडणुका कशा होणार?

## खर्गेंचा सवाल

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी बुधवारी म्हटले की, पक्षाला सध्या निधीची कमतरता भासत आहे. भाजप सरकारने ज्या बँक खात्यांमध्ये देणगीतून मिळालेले पैसे काँग्रेसने ठेवले होते ते गोठवले आहेत. हा आमचा पक्षाचा पैसा होता जो सामान्य जनतेने दान केला होता. आता आमच्याकडे खर्च करायला पैसे नाहीत.



काँग्रेस अध्यक्ष पुढे म्हणाले, आमच्या पक्षाची चार बँक खाती बंद करण्यात आली आहेत. यामध्ये युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, दिल्ली काँग्रेस आणि एआयसीसीच्या खात्यांचा समावेश आहे. अशीच खाती बंद केली तर निकोप निवडणूक होईल का?

प्रत्यक्षात आयकर विभागाने 13 फेब्रुवारी रोजी काँग्रेस पक्षाला 105 कोटी रुपयांची थकबाकी वसूल करण्यासाठी नोटीस पाठवली होती. विभागाने काँग्रेसला 210 कोटी रुपयांचा दंड ठोठावला आणि बँक खाती गोठवली. काँग्रेस नेते आणि वकील विवेक तंखा यांनी आयकराच्या कारवाईविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. बुधवारी न्यायालयाने काँग्रेसच्या बँक खात्यांवर आयटी कारवाई थांबवण्याची याचिका फेटाळली आहे.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती यशवंत वर्मा आणि न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौरव यांच्या खंडपीठाने सांगितले की, प्राप्तिकर अपीलीय न्यायाधिकरणाच्या निर्णयात अडथळा आणण्याचे कारण नाही.

अपीलीय न्यायाधिकरणाच्या निर्णयानंतर काँग्रेसचे कोषाध्यक्ष अजय माकन म्हणाले होते की, भाजप सरकारने यासाठी जाणीवपूर्वक लोकसभा निवडणुकीची वेळ निवडली होती. काँग्रेसचा निधी रोखणे हा लोकशाहीवर हल्ला आहे, कारण तो निवडणुकीपूर्वी येतो. आयकर अधिकाऱ्यांनी काँग्रेस पक्षाच्या खात्यातून 270 कोटी रुपये जप्त केले असताना अशा परिस्थितीत निष्पक्ष निवडणुकांची अपेक्षा कशी करता येईल.

काँग्रेस कायदेशीर सेलचे प्रमुख विवेक तंखा म्हणाले की, आम्हाला यावेळी सुरक्षा आदेशाची गरज आहे. पक्ष आणि निवडणुका येतील आणि जातील, पण महसूल हा सरकारचा विभाग आहे. भारताला कायद्याचे पालन

## भारतासोबतच्या संबंधांवर चीनची भूमिका

# परस्पर विश्वासाची गरज, भारताशी आमचे संबंध मजबूत



**वृत्तसंस्था**
**बीजिंग**

चीनचे म्हणणे आहे की भारतासोबतचा सीमावाद दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंधांचे प्रतिनिधित्व करत नाही. नुकतेच परराष्ट्र मंत्री एस जयशंकर म्हणाले होते - जोपर्यंत सीमा विवाद सुटत नाही तोपर्यंत भारत-चीन संबंध सामान्य होऊ शकत नाहीत. यावर चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते वांग वेनबिन म्हणाले - भारत-चीन सीम विवाद दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंधांचे प्रतिनिधित्व करत नाही. आपण एकमेकांवर विश्वास ठेवायला हवा. यामुळे आपल्यातील गैरसमज दूर होतील आणि आपले नाते मजबूत होईल.

परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी चीनवर सीमेवर रक्तपात आणि लिखित करारांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला. जपानची राजधानी टोकियो येथे आयोजित रायसीना गोलमेज परिषदेत बोलताना जयशंकर म्हणाले होते - 1975 ते 2020 या काळात सीमेवर शांतता होती. 2020 मध्ये सर्व काही बदलले (गलवान संघर्ष). अनेक मुद्द्यांवर आमचे (भारत-चीन) एकमत नाही. शेजारी लिखित करारांचे उल्लंघन करतात तेव्हा ही चिंतेची बाब आहे. यामुळे त्यांच्या नात्याच्या स्थिरतेवर प्रश्न निर्माण होतात.

24 जुलै रोजी भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल ब्रिक्स परिषदेत सहभागी होण्यासाठी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे आले होते. बैठकीदरम्यान एनएसए डोवाल म्हणाले होते की 2020 मध्ये सीमा विवादानंतर भारत आणि चीनमधील सामरिक विश्वास संपुष्टात आला आहे. यावेळी चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी देखील उपस्थित होते.

2020 मध्ये एप्रिल-मेमध्ये चीनने पूर्व लडाखच्या सीमावर्ती भागात सरावाच्या निमित्ताने सैन्य तैनात केले होते. यानंतर अनेक ठिकाणी घुसखोरीच्या घटना घडल्या. भारत सरकारनेही या भागात चीनइतकेच सैन्य तैनात केले होते. परिस्थिती इतकी बिकट झाली की 4 दशकांहून अधिक काळ एलएसीवर गोळ्या झाडल्या गेल्या. दरम्यान, 15 जून रोजी गलवान खोऱ्यात चिनी सैन्यासोबत झालेल्या चकमकीत 20 भारतीय जवान शहीद झाले होते.

# तामिळनाडूच्या मंत्र्याने मोदींना दिली जीवे मारण्याची धमकी

**वृत्तसंस्था**
**चेन्नई**

तामिळनाडूचे मंत्री टी.एम. अंबरसन यांचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. यामध्ये ते पीएम मोदींविरोधात वादग्रस्त वक्तव्य करत आहेत. त्यात ते म्हणत आहेत की, मी मंत्री असल्यामुळे मी सध्या शांतता राखली आहे. मी मंत्री नसतो, तर मी त्यांचे (पीएम मोदी) तुकडे केले असते. त्यांचे हे वक्तव्य गेल्या आठवड्यातील असल्याचे बोलले जात आहे. सुप्रीम कोर्टाच्या वकिलाने संसद मार्ग पोलिस स्टेशनमध्ये अंबरसन यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. टी.एम. अंबरसन हे तामिळनाडूमधील एमके स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील DMK-काँग्रेस आघाडी सरकारमध्ये ग्रामीण उद्योग मंत्री आहेत. व्हायरल व्हिडिओमध्ये अंबरसन म्हणत आहेत की, आमचे अनेक पंतप्रधान झाले आहेत, कोणीही असे बोलत नव्हते. मोदी आम्हाला संपवण्याची गोष्ट करतात, पण मी तुम्हाला एक गोष्ट आठवण करून देतो की द्रमुक ही सामान्य संघटना नाही. अनेक बलिदान आणि रक्तपातानंतर ती बांधली गेली.

# केजरीवालांच्या घराबाहेर हिंदू निर्वासितांची निदर्शने

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

पाकिस्तानातील हिंदू निर्वासित गुरुवारी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या घरासमोर निदर्शने करत आहेत. पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानातून निर्वासित भारतात आल्यास कायदा आणि सुव्यवस्था बिघडेल, चोरी, दरोड्यासारखे गुन्हे वाढतील या केजरीवाल यांच्या विधानावर हे निर्वासित संतापले आहेत.

निदर्शनांदरम्यान, केजरीवाल यांनी आज (14 मार्च) पुन्हा पत्रकार परिषद घेतली आणि सीएए देशासाठी धोकादायक असल्याचे सांगितले. जर भारत सरकारने पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमधील अल्पसंख्याकांसाठी दरवाजे उघडले तर त्यांना येथे नोकरी आणि घरे दिली जातील. भारतातही रोजगाराचा अभाव आहे. येथील लोकांच्या नोकऱ्या इतर देशांतून येणाऱ्या लोकांना दिल्या जातील. हे मला मान्य नाही.

CAA बाबत केजरीवाल यांच्या वक्तव्यावर गृहमंत्री अमित शहा यांनी



प्रतिक्रिया दिली आहे. केजरीवाल यांना माहिती नाही, असे त्यांनी एका मुलाखतीत सांगितले. 2014 पर्यंत भारतात आलेल्या निर्वासितांना नागरिकत्व दिले जाणार आहे.

केजरीवाल गुरुवारी म्हणाले, 'फाळणीच्या वेळी जे झाले त्यापेक्षाही मोठे स्थलांतर होईल. पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमध्ये 3-4 कोटी अल्पसंख्याक राहतात. भारतीय नागरिकत्व हे त्यांचे स्वप्न आहे आणि जर भारताने दार उघडले तर ते येथे येतील. मग काय करणार.

गृहमंत्री म्हणत आहेत. 2014 पूर्वी आलेल्या लोकांचे पुनर्वसन केले जाईल. त्यांचे अजून येणे थांबले आहे का? 2014 पूर्वी या लोकांमध्ये भीती होती की पकडले तर ते घुसखोर आहेत आणि तुरुंगात टाकले जातील. इतके दरवाजे उघडले जात आहेत, त्यानंतर एवढ्या मोठ्या संख्येने लोक येतील की कल्पना करणे कठीण आहे.

आता तुम्ही पाकिस्तान आणि बांगलादेशातून लोकांना आणून त्यांना नोकऱ्या द्याल आणि त्यांची रेशनकार्ड बनवाल. पाकिस्तानच्या लोकांनी कर भरला नाही. येथील जनतेने दिले आहे. इथल्या लोकांच्या टॅक्सच्या पैशातून तुम्हाला या लोकांना वसवायचे आहे हे मला मान्य नाही.

मी लोकांना विचारतो की, जर पाकिस्तानातून आलेल्या लोकांच्या झोपडपट्ट्या रस्त्याच्या पलीकडे वसवल्या गेल्या तर ते तुम्हाला मान्य असेल. तुमच्या सुना सुरक्षित राहतील का? तुम्हाला सुरक्षित वाटेल. देश सुरक्षित राहील का? पाकिस्तान अशा अनेक लोकांना परत पाठवेल. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. कॅनडाने आपले दरवाजे उघडले, एक विकसित देश होता आणि आज परिस्थिती वाईट आहे. आता ते इमिग्रेशन थांबवत आहेत. अमेरिकेत थांबवले जात आहे. संपूर्ण जगाची ही स्थिती आहे. आपल्या देशात गेल्या 10 वर्षांत केंद्राच्या धोरणांमुळे आणि अत्याचारामुळे 11 लाख उद्योगपतींनी भारत सोडला. ते श्रीमंत आहेत, ते उद्योगधंदे उघडतील, कारखाने काढतील आणि रोजगार देतील. तुम्ही यांना आणा.'

## संपादकीय

### शहरांना हवामानाच्या वास्तविकतेशी जुळवून घेणे हाच एकमेव उपाय

जग विक्रमी वार्षिक जागतिक तापमान आणि आपत्तीजनक हवामान धोक्यांचे साक्षीदार असल्याने हवामान कृतीची अनिवार्यता निर्विवाद झाली आहे. हवामान बदल हाताळण्यासाठी दोन मूलभूत मार्गांचा समावेश होतोः जागतिक तापमानवाढीला कारणीभूत ठरणारे हरितगृह वायू (जीएचजी) उत्सर्जन कमी करणे आणि हवामान बदलाच्या परिणामांमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी अनुकूल वातावरण तयार करणे. जरी दोन्ही मार्ग पूरक असले तरी, जागतिक लक्ष प्रामुख्याने शमन करण्यावर केंद्रित आहे. पॅरिस कराराबाबत आशावाद असूनही, कठोर वास्तव हे आहे की आपण जागतिक तापमानासाठी 1.5 अंश सेल्सिअसची मर्यादा ओलांडण्याच्या मार्गावर आहोत. इंटरगव्हर्नमेंटल पॅनल फॉर क्लायमेट चेंज (आय. पी. सी. सी.) 2030 च्या दशकाच्या सुरुवातीलाच या संभाव्य उल्लंघनाची पूर्वसूचना देते. सध्याच्या या मार्गावर, हवामानाच्या परिणामांचा सामना करणे आणि त्यांच्याशी जुळवून घेणे हा आता किरकोळ पर्याय नसून तातडीची गरज आहे. परिस्थितीशी जुळवून घेण्यात अयशस्वी झाल्यास मोठ्या प्रमाणात विनाशकारी मानवी, आर्थिक आणि पर्यावरणीय नुकसान होईल. हवामान बदल हाताळण्यासाठी दोन मूलभूत मार्गांचा समावेश होतोः जागतिक तापमानवाढीला कारणीभूत ठरणारे हरितगृह वायू (जीएचजी) उत्सर्जन कमी करणे आणि हवामान बदलाच्या परिणामांमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी अनुकूल वातावरण तयार करणे. हवामान बदलाच्या विकासासाठी अशा लक्षणीय उपायांची गरज आहे अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी पायाभूत आणि वास्तववादी दृष्टिकोनाची आवश्यकता आहे, ज्यामुळे पुढील तापमानवाढ कमी करण्यासाठी प्रयत्न करत असताना परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या गरजेवर भर दिला जातो. हवामान बदल स्वीकार करण्याची गरज शहरी स्तरावर विशेषतः महत्त्वपूर्ण ठरते, जिथे बहुसंख्य जागतिक लोकसंख्या राहते आणि ते हवामानाचे थेट परिणाम अनुभवतात. भारत आणि आफ्रिकेसारख्या विकसनशील देशांमधील शहरांसाठी हे विशेषतः योग्य आहे, जिथे सध्या भविष्यातील विकास सुरू आहे. पाणीपुरवठा, वीज आणि सांडपाणी व्यवस्था यासारख्या बहुतांश आवश्यक पायाभूत सुविधा अद्याप बांधल्या गेल्या नाहीत आणि सध्याच्या पायाभूत सुविधांची रचना सध्याच्या हवामानातील घटनांसाठी केली गेली नाही. शिवाय, कोट्यवधी लोक झोपडपट्ट्यांसारख्या अनौपचारिक वसाहतींमध्ये राहतात, त्यांना मूलभूत सेवांचा अभाव असतो आणि ते अनेकदा विकास नियमांच्या बाहेरील भागात राहतात. या प्रदेशांमधील वाढत्या हवामानाच्या जोखमीमुळे पूर, उष्णतेची लाट आणि मुसळधार पावसामुळे त्यांची सध्याची आव्हाने वाढतात, ज्यामुळे ते अधिकाधिक दुर्गम होतात. अशा प्रकारे, बदल स्वीकार करणाऱ्या उपायांच्या अंमलबजावणीमध्ये स्थानिक दृष्टिकोनास प्राधान्य दिले गेले पाहिजे, जोखीम व्यवस्थापित करण्यावर आणि चालू असलेल्या विकास प्रयत्नांसह लवचिकता निर्माण करण्यावर नव्याने भर दिला गेला पाहिजे. या प्रदेशांमधील वाढत्या हवामानाच्या जोखमीमुळे पूर, उष्णतेची लाट आणि मुसळधार पावसामुळे त्यांची सध्याची आव्हाने वाढतात, ज्यामुळे ते अधिकाधिक दुर्गम होतात. प्रभावी हवामान बदल स्वीकारणे साध्य करण्यासाठी भारतीय शहरांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. प्रथम, राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक स्तरावर जबाबदाऱ्या लक्षणीय प्रमाणात कमी केल्या जातात, परिणामी 'कोण काय करते' यावर अस्पष्ट, खंडित किंवा परस्पर व्याप्त आदेश दिले जातात. हवामान अनुकूलतेसाठी अधिक प्रगत उपायांची अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्रीय आणि राज्य सरकारांकडून नगरपालिकांना त्यांच्या कायदेशीर अधिकारात वारंवार अडथळे येतात. उपाय सामान्यतः सर्वसमावेशक दृष्टिकोनाऐवजी प्रकल्प-केंद्रित, तात्पुरत्या दृष्टिकोनाचे पालन करतात. उदाहरणार्थ, पूर व्यवस्थापन हे केवळ नगरपालिकेच्या अधिपत्याखाली येत नसले तरी, पूर कमी करण्यासाठीचा अविभाज्य घटक, सांडपाणी वाहून नेणे यासारखे महत्त्वाचे घटक करतात. यामुळे अडथळे निर्माण होतात आणि नगरपालिकेच्या अजेंड्यात हवामान बदलावर भर दिला जात नाही. शिवाय, हवामान बदलाची भाषा आणि समज, विशेषतः परिस्थितीशी जुळवून घेणे, क्षेत्राबाहेरील लोकांसाठी आव्हानात्मक सिद्ध होते. महानगरपालिकेच्या निर्णयकर्त्यांमध्ये अनेकदा हवामान बदलाचे अस्तित्व आणि गुंतागुंतीबद्दल जागरूकता नसते, ज्यामुळे हवामानविषयक बाबींचा विचार न करता निर्णय घेतले जातात. त्याव्यतिरिक्त, शहरातील अधिकाऱ्यांकडे शहरी भाग आणि हवामानातील जोखमींविषयी माहिती आणि माहितीची कमतरता असू शकते- जी सध्याच्या हवामान बदलाची परिस्थिती समजून घेण्यासाठी आधारस्तंभ आहे. प्रणालीगत जोखीम आणि परिणामांवरील सर्वसमावेशक माहितीशिवाय ते हवामान बदलाच्या गुंतागुंतीच्या समस्येचे वर्गीकरण करतात आणि त्या प्रत्येकाला स्वतंत्रपणे हाताळतात (जसे की पूर, निचरा, कचरा इ.). ) एकात्मिक दृष्टीकोन स्वीकारण्याऐवजी. याव्यतिरिक्त, या अधिकाऱ्यांकडे अनुकूलतेसाठी कठोर पायाभूत सुविधा आणि तांत्रिक उपायांच्या योग्य अंमलबजावणीसाठी आवश्यक तांत्रिक क्षमता आणि संसाधनांचा वारंवार अभाव असतो. महानगरपालिकेच्या निर्णयकर्त्यांमध्ये अनेकदा हवामान बदलाचे अस्तित्व आणि गुंतागुंतीबद्दल जागरूकता नसते, ज्यामुळे हवामानविषयक बाबींचा विचार न करता निर्णय घेतले जातात. ही सर्व आव्हाने एक दुष्टचक्र तयार करतात जे हवामान स्वीकारण्याच्या प्रयत्नांमध्ये अडथळा आणते आणि शेवटी, अर्थपूर्ण हवामान कृतीमध्ये अडथळा आणते. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी शहरी हवामान कृतीमध्ये बदल करण्यासाठी एक समर्पित दृष्टीकोन आवश्यक आहे. हवामान पूरक शहरे साध्य करण्यासाठी धाडसी धोरणांची आवश्यकता आहे, ज्यामुळे परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी समज, नियोजन आणि वित्तपुरवठ्यात क्रांती घडू शकते. शहरातील विकास अधिकाऱ्यांनी त्यांच्या शहरी आणि हवामानविषयक माहितीच्या संकलनाचा सक्रियपणे विस्तार केला पाहिजे. राज्यस्तरीय शहर हवामान कक्षाची स्थापना ही माहिती संकलन सुव्यवस्थित करू शकते आणि समन्वय, प्रमाणीकरण आणि गुणवत्ता नियंत्रण प्रक्रिया वाढवू शकते. विशेषतः झोपडपट्ट्या आणि इतर अनौपचारिक वसाहतींसारख्या असुरक्षित भागात हवामानातील जोखीम आणि तळागाळातील प्रयत्न समजून घेण्यात मूल्यांकन आणि विश्लेषणात्मक साधने महत्त्वाची भूमिका बजावतात. स्थानिक, स्वदेशी आणि वैज्ञानिक ज्ञानाचे मिश्रण असलेला समग्र दृष्टीकोन स्वीकारणे महत्त्वाचे आहे. समुदाय-नेतृत्वाखालील माहिती संकलन आणि देखरेख साधने अनौपचारिक वसाहतींमधील माहितीची तफावत भरून काढू शकतात, जी त्यांच्या अद्वितीय विकास शैलीचे अनुसरण करतात. हवामान कृतीमध्ये समुदायाला सहभागी केल्याने केवळ रहिवाशांनाच सक्षम केले जात नाही तर त्यांची अनुकूल क्षमता देखील वाढते, ज्यामुळे ते हवामानामुळे तयार होणाऱ्या आव्हानांचा अधिक प्रभावीपणे आणि सहकार्याने प्रतिसाद देण्यासाठी तयार होतात. याव्यतिरिक्त, माहिती संकलन आणि विश्लेषणात स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था आणि विचारवंतांचा सक्रिय सहभाग नवीनतम हवामान मॉडेल, कल आणि प्रत्यक्ष क्रियाकलाप सादर करू शकतो, ज्यामुळे निर्णयकर्त्यांसाठी धोरणात्मक शिफारशींमध्ये आणखी योगदान मिळू शकते. हवामान कृतीमध्ये समुदायाला सहभागी केल्याने केवळ रहिवाशांनाच सक्षम केले जात नाही तर त्यांची अनुकूल क्षमता देखील वाढते, ज्यामुळे ते हवामानामुळे तयार होणाऱ्या आव्हानांचा आव्हानांचा अधिक प्रभावीपणे आणि सहकार्याने प्रतिसाद देण्यासाठी तयार होतात. हवामानातील जोखीम समजून घेण्यासाठी, उपाय शोधण्यासाठी आणि अनुकूलन उपक्रम शाश्वतपणे व्यवस्थापित करण्यासाठी स्थानिक सरकारांची क्षमता बळकट करणे महत्त्वाचे आहे. नगरपालिकेत प्रशिक्षित तज्ज्ञांसह व्यापक हवामान बदल विभागाच्या निर्मितीमुळे स्थानिक अधिकाऱ्यांच्या तांत्रिक क्षमतेला चालना मिळू शकेल आणि हवामान उपायांसाठी अनुकूल वातावरण निर्माण होऊ शकेल. हा विभाग नगरपालिकेला जनतेशी प्रभावीपणे संवाद साधण्यास मदत करू शकतो, ज्यामुळे हवामानातील गुंतागुंतीच्या संकल्पना समुदायाला पटतील अशा प्रकारे व्यक्त केल्या जातील. 2021-2022 मध्ये हवामान बदलाचा स्वीकार करण्याच्या प्रयत्नांसाठी एकूण हवामान वित्तपुरवठ्यापैकी केवळ 5 टक्के वाटप करण्यात आले होते हे लक्षात घेता गुंतवणूकीच्या आघाडीवर सहयोगी प्रयत्न महत्त्वपूर्ण आहेत. उद्योगातील खेळाडू आणि आंतरराष्ट्रीय निधी संस्थांनी आंतरशाखीय संशोधन आणि विश्लेषणासाठी अनुदान दिले पाहिजे. बहुपक्षीय विकास बँका (एम. डी. बी.) शहरांमधील विकास प्रकल्पांच्या आर्थिक चौकट आणि अंमलबजावणी यंत्रणेत हवामानातील लवचिकता अंतर्भूत करण्यावर अधिक भर देऊ शकतात. शिवाय, कॉन्फरन्स ऑफ द पार्टीज (सीओपी) ग्रुप ऑफ ट्वेंटी (जी-20) इत्यादी जागतिक मंच आहेत. विकसनशील राष्ट्रांना मदत करण्यासाठी आणि शहरी हवामान कृतीसाठी सक्षम वातावरण तयार करण्यासाठी विकसित देशांकडून वचनबद्धता प्राप्त करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते.

# भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणाकरता सामर्थ्यवान महिलांची आवश्यकता

भारताने आपली महत्त्वाकांक्षी हवामान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आर्थिक सहभागातील लैंगिक तफावत कमी करण्याकरता मोठी आणि जलद पावले उचलण्याची गरज आहे. हरित अर्थव्यवस्थेच्या दिशेने होणारे न्याय्य आणि योग्य संक्रमण महिलांना हवामान कृतीत, विशेषत: स्वच्छ ऊर्जा संक्रमणातील मुख्य भागधारक म्हणून स्थापित करून साकार केले जाऊ शकते. या संदर्भात, यंदाच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाची 'महिलांमध्ये गुंतवणूक करा: प्रगतीचा वेग वाढवा' ही संकल्पना अत्यंत समर्पक आणि समयोचित आहे.



हवामान बदल ही लैंगिकदृष्ट्या तटस्थ समस्या नाही. महिला आणि मुलींसह, विशेषतः गरीब आणि विकसनशील देशांतील उपेक्षित गटांवर याचा विषम परिणाम होतो. असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे की, हवामान बदलामुळे येत्या २५ वर्षांत १५८ दशलक्ष अधिक महिला आणि मुली गरिबीत ढकलल्या जातील. घरगुती ऊर्जा, अन्न, पाणी आणि सांभाळ करण्यासंबंधीच्या कामाशी संबंधित विद्यमान भूमिकांमुळे आणि जबाबदाऱ्यांमुळे महिलांना अनेकदा जास्त जोखमीचा सामना करावा लागतो. या भूमिका विद्यमान सामाजिक आणि सांस्कृतिक नियमांनी प्रेरित आहेत.

घरगुती ऊर्जा, अन्न, पाणी आणि सांभाळ करण्यासंबंधीच्या कामाशी संबंधित विद्यमान भूमिकांमुळे आणि जबाबदाऱ्यांमुळे महिलांना अनेकदा जास्त जोखमीचा सामना करावा लागतो.

महिलांमध्ये गुंतवणूक केल्याने आणि लैंगिक तफावत मिटवल्याने त्याचा थेट परिणाम आर्थिक विकासावर होईल यात शंका नाही. भारताच्या 'जीडीपी'मध्ये महिला कर्मचाऱ्यांचे योगदान जेमतेम १८ टक्के आहे. कुशल कर्मचाऱ्यांमधील महिलांच्या वाढत्या सहभागात देशाचा विकास दर वृद्धिंगत करण्याची प्रचंड क्षमता आहे.

विविध क्षेत्रांतील श्रमशक्तीत महिलांचे प्रतिनिधित्व कमी आहे. उदाहरणार्थ, निवासी किंवा व्यावसायिक इमारतीच्या छतावर वीज-निर्मिती करणारे सौर पॅनेल बसवले जातात. या क्षेत्रात, देशाच्या कर्मचाऱ्यांपैकी केवळ ११ टक्के महिला आहेत, जी ३२ टक्के असलेल्या जागतिक सरासरीपेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहे. प्रशासकीय आणि सहाय्य सेवा यांसारख्या 'महिलांच्या' मानल्या जाणाऱ्या सेवांमध्येही स्त्रियांना असमानतेने गटबद्ध केले जाते, तर तांत्रिक पदांवर अद्यापही पुरुषांचे वर्चस्व आहे. भारतातील महिलांचा पदवी प्राप्त करण्याचा दर उच्च असूनही, व्यवस्थेतील अनेक अडथळे स्त्रियांना विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (स्टेम) क्षेत्रात करिअर करण्यापासून परावृत्त करतात.

विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित विद्याशाखेत पदवी संपादन करणाऱ्या महिलांची संख्या जगभरात भारतामध्ये सर्वाधिक आहे आणि दर वर्षी या संख्येत सातत्याने भर पडत आहे. उपयोग करून न घेतलेले हे मानवी भांडवल संसाधन हवामान बदलाचा सामना करण्यासाठी जादूची कांडी ठरू शकते. मात्र, वास्तव असे आहे की, ज्या स्त्रिया विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित क्षेत्रातील करिअरची निवड करतात, त्यांना त्यांच्या पुरुष समकक्षांच्या तुलनेत खूप कमी वेतन मिळते आणि त्या हळूहळू कर्मचारीवर्गातून बाहेर पडतात अथवा करिअरचा मार्ग बदलतात. ही एक गंभीर चिंतेची बाब आहे आणि देशाच्या हवामान उद्दिष्टांवर त्याचा परिणाम होतो.

प्रशासकीय आणि सहाय्य सेवा यांसारख्या 'महिलांच्या' मानल्या जाणाऱ्या सेवांमध्येही स्त्रियांना असमानतेने गटबद्ध केले जाते, तर तांत्रिक पदांवर अद्यापही पुरुषांचे वर्चस्व आहे.

महिलांच्या आर्थिक सहभागाचे अनेक फायदे असले तरी, अद्यापही महत्त्वपूर्ण कायदेशीर, संरचनात्मक आणि सांस्कृतिक अडथळे आहेत, ज्याचे गांभीर्याने आत्मनिरीक्षण करणे आवश्यक आहे. हा लेख यांपैकी काही व्यवस्थेतील अडथळ्यांवर लक्ष केंद्रित करतो, ज्यावर त्वरित लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

हवामान-संबंधित आर्थिक गुंतवणूक, धोरणे आणि उपक्रमांत लैंगिक समानतेला संबोधित करणाऱ्या समग्र दृष्टिकोनाचा अभाव:

नोव्हेंबर २०२२ मध्ये पार पडलेल्या हवामान बदलावरील संयुक्त राष्ट्रांच्या चौकटीतील पक्षांच्या २७व्या परिषदेत हवामान-संबंधित आर्थिक गुंतवणूक, धोरणे आणि उपक्रमांत लैंगिक समानतेला संबोधित करणाऱ्या समग्र दृष्टिकोनावर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, ज्याद्वारे महिलांना उद्योजक, समुदाय नेत्या, कुटुंबप्रमुख आणि ग्राहक म्हणून सक्षम बनवण्याकरता क्षेत्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन करण्यात आले. महिला प्रामुख्याने हवामान कृतींत, विशेषत: त्यांच्या व्यवसाय, समुदाय आणि घरांमध्ये अनुकूल यंत्रणा निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात, यावर हवामान-संबंधित- आर्थिक गुंतवणूक, धोरणे आणि उपक्रमांत लैंगिक समानतेला संबोधित करणारी गुंतवणूक शिक्कामोर्तब करते. ज्या कंपन्यांचे नेतृत्व महिला करत आहेत, त्यांच्या व्यवसाय पद्धतींत शाश्वत पद्धत स्वीकारण्याची आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्याची अधिक शक्यता असते. महिला नेतृत्व आणि हवामानातील नवकल्पना यांच्यातील हा बळकट संबंध लक्षणीय आहे.

जबरदस्त पुरावे असूनही, हवामान-संबंधित आर्थिक गुंतवणूक, धोरणे आणि उपक्रमांत लैंगिक समानतेला संबोधित करणाऱ्या वित्तपुरवठ्यावर लक्ष केंद्रित करणारे फारच कमी प्रयत्न झाले आहेत. हवामान कृतीत लैंगिक मुद्दा 'अधिकचा जोडलेला' म्हणून पाहिला जातो आणि तो मूळ हवामान विषयक संभाषणाचा भाग बनत नाही. महिलांच्या नेतृत्वाखालील व्यवसायांना त्यांच्या पुरुष समकक्षांच्या तुलनेत पुरेसा निधी उपलब्ध होत नाही. कृषी क्षेत्रात जिथे महिलांची मोठी भूमिका आहे, तिथेही सुलभ वित्तपुरवठा यंत्रणेच्या बाबतीत महिला शेतकरी बऱ्याचदा मागे पडतात.

ज्या कंपन्यांचे नेतृत्व महिला करत आहेत, त्यांच्या व्यवसाय पद्धतींत शाश्वत पद्धत स्वीकारण्याची आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्याची अधिक शक्यता असते.

लैंगिक समानता ही हवामान बदलापासून स्वतंत्र असलेली समस्या म्हणून बघितली जाऊ शकत नाही आणि बघितली जाऊ नये. स्त्री-पुरुष समानतेची प्रगती, हवामान बदलाशी जुळवून घेणे आणि हवामान बदल कमी करण्याच्या दिशेने प्रयत्न करण्यासाठी एकत्र येणे आवश्यक आहे. हे हवामानासंबंधीच्या गुंतवणुकीत पुरेसे प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे.

लैंगिक-सर्वसमावेशकता प्रस्थापित होण्यासाठी अपुरी मानवी संसाधन धोरणे

आतापर्यंत, हवामान बदल धोरणांतील आणि प्रक्रियांतील महिलांच्या मर्यादित सहभागाचा अर्थ असा होतो की, हवामान कृती नियोजन महिलांकरता पुरेसे संवेदनशील नव्हते. स्वच्छ ऊर्जा क्षेत्राच्या बाबतीत, वरिष्ठ नेतृत्व आणि व्यवस्थापन विषयक भूमिकांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व नगण्य आहे. आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेने ऊर्जा-संबंधित क्षेत्रातील कंपन्यांच्या केलेल्या विश्लेषणानुसार, वरिष्ठ व्यवस्थापन पदांमध्ये महिलांचे प्रमाण १४ टक्क्यांहून कमी आहे. वरिष्ठ व्यवस्थापनात महिला जोवर भूमिका बजावत नाहीत, तोपर्यंत, कामाच्या ठिकाणी महिलांची विशिष्ट असुरक्षितता दूर करण्यासाठी लक्ष्यित उपाययोजना योजण्याची शक्यता कमी राहील. वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावर महिला प्रतिनिधित्व वाढवण्याव्यतिरिक्त, लिंगभेद कमी करण्यासाठी करण्यात येणाऱ्या कार्यक्षम हस्तक्षेपांचे विविधतेला अनुकूल वातावरण निर्माण करणे आणि आर्थिक बळाच्या वितरणात पारदर्शकता वाढवणे समाविष्ट आहे.

विशेषत: हवामान विषयक चर्चेत, मानवी संसाधन धोरणे आणि कामाच्या ठिकाणची लैंगिक असमानता यांच्यातील संबंधांवर अधिक जोर देणे आवश्यक आहे. कामाच्या ठिकाणच्या लैंगिक पूर्वग्रहांना संबोधित करण्यासाठी मनुष्यबळ विकास विभागाची धोरणे कायद्याच्या अनिवार्य आवश्यकतांच्या पलीकडे पोहोचणे आवश्यक आहे. पालकांची रजा, कामाच्या तासांची लवचिकता आणि महिलांविषयी संवेदनशील अहवाल यंत्रणा यांसारखी अनेक धोरणे अस्तित्वात आहेत, मात्र ती अनेकदा अंतर्निहित लैंगिक पूर्वग्रहांसह येतात. हे पूर्वग्रह अनेकदा काही भूमिकांत महिलांच्या क्षमतांविषयी चुकीचे समज निपजतात.

सांभाळ करण्याच्या कामाची पोचपावती न मिळणे

सांभाळ करण्याच्या कामाच्या आसपासचे सामाजिक नियम हे हवामान कृतीच्या दृष्टीने एक प्रमुख अडथळा आहेत. ग्रामीण भागातील स्त्रिया दिवसाचे सुमारे १४ तास विनामोबदला सांभाळ करण्याच्या कामात घालवतात, ज्याकडे खरे काम म्हणून पाहिले जात नाही. याचा प्रशिक्षण आणि उद्योजकता उपक्रमांसारख्या स्वच्छ ऊर्जा उपक्रमांशी संबंधित कामाकरता समर्पित केलेल्या वेळेवर परिणाम होतो. ऊर्जा ग्राहक, उत्पादक, उद्योजक आणि निर्णय घेणाऱ्या म्हणून, शाश्वत आणि स्वच्छ ऊर्जा संक्रमणामध्ये महिलांची प्रमुख भूमिका आहे.

विशेषत: हवामानविषयक चर्चेत मानवी संसाधन धोरणे आणि कामाच्या ठिकाणची लैंगिक असमानता यांच्यातील संबंधांवर अधिक जोर देणे आवश्यक आहे.

लैंगिक तफावत संबोधित करणे म्हणजे सांभाळ करण्याविषयी दीर्घकाळ चालत आलेले सामाजिक नियम बदलणे. 'सांभाळ करण्याचे काम हे महिलांचे काम आहे,' या समजाशी लढा देणे, हे पुरुषांना सांभाळ करण्याच्या कामात सहभागी होण्याकरता अधिक स्वीकारार्ह बनवण्यासाठी महत्त्वाचे आहे.

पुरावे स्पष्ट करतात की, या क्षेत्रातील शाश्वत संक्रमणाचा लाभ घेता येण्याकरता ज्या महत्त्वाच्या दुव्याची कमतरता आहे, ती म्हणजे स्वच्छ ऊर्जा मूल्य साखळीत महिलांना सहभागी करून घेणे. महिलांना केवळ घरगुती आणि सामुदायिक ऊर्जेच्या गरजांचे ज्ञान आहे असे नाही, तर अनौपचारिक नेटवर्कद्वारे ग्रामीण भागात त्यांची व्यापक पोहोच आहे. स्वच्छ ऊर्जा संक्रमणात गुंतवणूक आणि नवकल्पना वाढत असल्याने, महिलांसोबत उपक्रम राबविण्याचा आणि लैंगिक तफावत कमी करण्यासाठी विनामोबदला सांभाळ करण्यासारख्या कामाच्या समस्यांचे निराकरण शोधण्याचा हा एक उचित क्षण आहे.

अखेरीस, स्वच्छ ऊर्जेच्या दिशेने भारताच्या शाश्वत संक्रमणाकरता कर्मचाऱ्यांमध्ये महिलांचा व्यापक सहभाग असणे महत्त्वाचे आहे. शाश्वत भविष्याच्या दिशेने प्रगती करण्यास बाधा ठरणाऱ्या लैंगिक असमानतेच्या भोवतालचे पद्धतशीर अडथळे दूर करून भारताने नेतृत्व करीत इतरांना मार्ग दाखवायला हवा.

# सहाय्यकारी धोरणाद्वारे महिलांचे सक्षमीकरण

अनादी काळापासून, भारतात आणि कदाचित जगभरात, पारंपरिक लैंगिक भूमिकांचा अर्थ असा होतो की, घरातील बऱ्याच कामांचा भार घरातील महिलांवर पडतो. काळ बदलत आहे, मात्र तरीही घरातील कामाकरता कोणालाच मोबदला मिळत नाही. एकंदरीत, राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करण्यासाठी, घरगुती काम किंवा काळजी घेण्याचे उपक्रम जे प्रामुख्याने महिलांची जबाबदारी आहेत, ते अनुत्पादक मानले जातात, कारण ते देशाच्या सकल विकास उत्पादनात (जीडीपी) भर घालत नाहीत. यशाचे मोजमाप करण्यासाठी पैसा हा सर्वात सोपा मापदंड असलेल्या जगात महिलांनी केलेले अनेक महत्त्वपूर्ण योगदान कसे दुर्लक्षित केले जाते हे यावरून दिसून येते. २०१९ साली सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाची शाखा असलेल्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाद्वारे (एनएसओ) समाजातील स्त्री-पुरुषांच्या मोबदला आणि विनामोबदला कामाचे मोजमाप करण्याचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यात असे आढळून आले की, सरासरी भारतीय महिला २४३ मिनिटे विनावेतन काळजी घेण्याची कामे आणि घरगुती कामाकरता खर्च करते- सरासरी पुरुष या कामांकरता जितका वेळ देतो, त्याच्या सुमारे १० पट वेळ महिला देतात.



कुपोषित आईने कुपोषित मुलाला जन्म देण्याची शक्यता जास्त असते ,ज्याचा परिणाम मुलाच्या भविष्यातील पोषणावर, आरोग्यावर, शिक्षणावर आणि कमाईवर होतो.

जगभरात, औपचारिक व अनौपचारिक प्रकारे काळजी घेणाऱ्यांपैकी ८१ टक्के महिला आहेत आणि त्या पुरुषांपेक्षा ५० टक्के अधिक वेळ काळजी घेण्यात व्यतीत करतात. जरी अधिक संख्येने पुरुष काळजी घेण्याची भूमिका स्वीकारत आहेत, तरीही भारतातील स्त्रिया त्यांच्या कुटुंबातील आजारी व्यक्तीची अथवा अपंगांची काळजी घेण्याचा भार दुपटीने पेलतात. तसेच, सुरुवातीचे हजार दिवस म्हणजे, गर्भधारणा ते मुलाचा दुसरा वाढदिवस यामधील हजार दिवस, जे मुलाच्या संज्ञानात्मक व शारीरिक विकासावर सकारात्मक प्रभाव पाडण्याकरता सर्वात महत्त्वाची वेळ मानली जाते, ती गर्भाशयात सुरू होते. अशा प्रकारे, पहिल्या २७० दिवसांत, गर्भाचे आरोग्य आणि पोषण पूर्णपणे आईवर अवलंबून असते. कुपोषित मातेने कुपोषित मुलाला जन्म देण्याची अधिक शक्यता असते, ज्याचा परिणाम मुलाच्या भविष्यातील पोषण, आरोग्य, शिक्षण आणि कमाईवर होतो.

भारतात ग्रामीण भागात पाणी आणणे हेदेखील ग्रामीण भागातील महिलांचे काम असल्याचे गृहीत धरले जाते, ज्यामुळे पाणी उपलब्ध करण्याचा भार महिलांवर पडतो. ही जबाबदारी सोपवली गेल्याने मुली शाळा सोडतात. भारतातील स्त्रिया सरपण गोळा करण्यासाठी दर वर्षी सरासरी ३७४ तास घालवतात. किंबहुना, काळजी घेणे आणि घरगुती जबाबदाऱ्या या स्त्रियांची जबाबदारी मानली जाते, त्या त्यांना त्यांच्या खऱ्या क्षमतेशी न जुळणाऱ्या नोकऱ्या शोधण्यास प्रवृत्त करतात आणि जेव्हा त्यांना त्यांच्या क्षमतेनुसार रोजगार मिळतो तेव्हा त्यांना पुरुषांपेक्षा कमी पगार दिला जातो.

स्वयंपाक, साफसफाई, पाणी भरणे आणि बाळाला घेऊन वावरण्यापासून त्यांची आणि कुटुंबातील इतर वृद्ध, दिव्यांग किंवा आजारी व्यक्तींची काळजी घेण्यापर्यंत घरगुती कामांमधील महिलांचे योगदान कमी मानता येणार नाही.

भारतात ग्रामीण भागात पाणी आणणे हेदेखील ग्रामीण भागातील महिलांचे काम असल्याचे गृहीत धरले जाते, ज्यामुळे पाणी उपलब्ध करण्याचा भार महिलांवर पडतो.

महिला ही कामे का करतात? याचे उत्तर सोपे नाही. जीवशास्त्र मातृत्वाच्या अंत:प्रेरणेला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावते, कारण त्यात हार्मोनल, मज्जासंस्थेशी संबंधित आणि अनुवांशिक घटकांचा समावेश असतो, जे मातृवर्तनावर आणि नैसर्गिक काळजीवाहू प्रवृत्तीवर प्रभाव टाकतात. मात्र, मातृत्वाची अंत:प्रेरणा ही केवळ एक जैविक घटना नाही तर सामाजिक व सांस्कृतिकदेखील घटना आहे. लहानपणापासूनच अनेक महिलांना इतरांची काळजी घेण्याची जबाबदारी पार पाडण्यास शिकवले जाते. असे गृहीत धरले जाते की, एक महिला नैसर्गिकरित्या काळजी घेण्यास चांगली असते आणि यापैकी घरातील बहुतांश काम त्यांच्याकडे सोपवले जाते.

भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व कायम राखले आहे आणि सरकारला महिलांसाठी सकारात्मक उपाययोजना आखण्याचे अधिकार दिले आहेत. महिला जटिल स्वरूपाची कामे हाती घेत असली तरी ती अनुत्पादक मानली जातात, जसे- 'पाणी-हिरा विरोधाभास'- म्हणजे, पाणी हे एकंदरीत हिऱ्यांपेक्षा जास्त उपयुक्त असले तरी जगण्याच्या दृष्टीने हिऱ्यांना बाजारात जास्त मूल्य आहे. महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणारी अनेक धोरणे आहेत. नारी शक्ती वंदन अधिनियमाद्वारे (२०२३) लोकसभा, राज्य विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. वॉश- (वॉटर, सॅनिटेशन, हायजीन) अर्थात पाणी, स्वच्छता सुविधा व स्वच्छता, आणि साक्षरता व आरोग्य परिणाम यांसारख्या कार्यक्रमांच्या रचनेत आणि अंमलबजावणीत महिलांना सहभागी करून घेतल्याने त्यांचा सामाजिक समावेश होईल आणि त्यांची लैंगिक समानता सुनिश्चित होईल. स्त्री-पुरुष समानतेमुळे महिलांनाही समान वेतन मिळेल. महिलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी काही योजना आधीच अस्तित्वात आहेत. सरकारने सुरू केलेल्या प्रधानमंत्री मुद्रा योजना, स्टँड-अप इंडिया आणि पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम यांसारख्या योजनांच्या मदतीने महिला स्वतःचे उद्योग सुरू करू शकतात. 'प्रधानमंत्री उज्ज्वला योजने'चे उद्दिष्ट महिलांना स्वच्छ स्वयंपाकाचे इंधन उपलब्ध करून देऊन त्यांना निरोगी ठेवणे आणि लाकूड गोळा करण्याच्या ओझ्यापासून त्यांना मुक्त करणे हे आहे. मात्र, महिला सबलीकरणासाठी अधिक सरकारी धोरणे आणि उपक्रमांचा अवलंब करणे आवश्यक आहे.

महिला जटिल स्वरूपाची कामे हाती घेत असली तरी ती अनुत्पादक मानली जातात, जसे- 'पाणी-हिरा विरोधाभास'- म्हणजे, पाणी हे एकंदरीत हिऱ्यांपेक्षा जास्त उपयुक्त असले तरी जगण्याच्या दृष्टीने हिऱ्यांना बाजारात जास्त मूल्य आहे. महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणारी अनेक धोरणे आहेत.

महिलांनी त्यांच्या आंतरिक मूल्याचे, तसेच त्यांनी योगदान दिलेल्या कामाचे महत्त्व मान्य करायला हवे आणि त्याला दाद द्यायला हवी. यामध्ये केवळ कुटुंबातील पारंपरिक काळजीवाहू भूमिकांचा समावेश होतो, जसे की मुलांचे पालनपोषण करणे आणि घरातील कामांकडे लक्ष देणे, परंतु ही भूमिका महिलांनी जीवनाच्या विविध क्षेत्रांत प्रदान केलेले अपरिचित भावनिक श्रम आणि समर्थनापर्यंतही विस्तारित आहेत. महिलांच्या अमूल्य योगदानाशिवाय जग टिकणार नाही.

महत्वाचे

## महामार्गावर युवकांनी माजवली कोयताने दहशत

**लातूर :** लातूर शहरात हातात कोयता घेऊन दोन युवकांनी दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. युवकांचा हा प्रकार सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाला. पोलिसांनी त्या आधारे एका युवकाला ताब्यात घेतले आहे. दुसऱ्या युवकाचा शोध सुरु असल्याची माहिती पोलिसांनी दिली.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनूसार लातूर-बार्शी महामार्गावर दोन युवकांनी हातात कोयता घेऊ दहशत माजवली. युवकांनी काही गाड्यांच्या काचा देखील फोडल्या. युवकांचा हातात कोयता घेऊन फिरतानाचा एक व्हिडिओ सीसीटीव्ही कमॅरामध्ये कैद झाला आहे. यामध्ये युवक हातात कोयता घेऊन महामार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना धाक दाखवून त्यांच्याकडील मोबाईल आणि रोख रक्कम घेत दहशत माजवण्याचा प्रयत्न केला गेला. या दोन्ही युवकांवर लातूर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही व्हिडिओच्या माध्यमातून मिळालेल्या फुटेजनूसार तोहिद अकबर पठाण (वय 21) या युवकास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या घटनेतील अन्य युवक वैभव उर्फ (मोन्या) बनसोडे (वय 18) याचा शोध सुरु असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## ललित पाटीलसह 14 जणांविरुद्ध 3 हजार पानी आरोपपत्र दाखल

**पुणे :** अमली पदार्थ तस्कर ललित पाटील याच्यासह १४ जणांविरुद्ध पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने विशेष न्यायाधीश व्ही. आर. कचरे यांच्या न्यायालायात आरोपपत्र दाखल केले. पोलिसांनी दाखल केलेले आरोपपत्र तीन हजार १५० पानी आहे. आरोपपत्रातून पोलिसांनी महत्वाचे पुरावे न्यायालयात सादर केले आहेत. अमली पदार्थ तस्करीचा मुख्य सूत्रधार ललित अनिल पाटील (वय ३७, रा. नाशिक), अरविंदकुमार प्रकाशचंद लोहरे (सध्या रा. मुंबई, मूळ रा. उत्तरप्रदेश), अमित जानकी सहा उर्फ सुभाष जानकी मंडल (वय २९, सध्या रा. पुणे), रौफ रहीम शेख (वय १९, रा. ताडीवाला रस्ता, पुणे रेल्वे स्थानक परिसर), भूषण अनिल पाटील (वय ३४), अभिषेक विलास बलकवडे (वय ३६), प्रज्ञा अरुण कांबळे उर्फ प्रज्ञा रोहित मोहिरे (वय ३९), जिशान इक्बाल शेख, शिवाजी अंबादास शिंदे (वय ४०, सर्व रा. नाशिक)अशी आरोपपत्र दाखल केलेल्यांची नावे आहेत.

# तिकिटाचं माहीत नाही, मी संन्यास घेतलेला नाही!
## उदयनराजें भोसलेंच्या मनात आहे तरी काय?

प्रतिनिधी
**सातारा**

राज्यात लोकसभा निवडणुकीसाठी भाजपकडून पहिली उमेदवारी यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये 20 जणांचा समावेश आहे. मात्र, साताऱ्यातून ) खासदार उदयनराजे भोसले यांची उमेदवारी जाहीर न करण्यात आल्याने समर्थकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. जर योग्य निर्णय झाला नाही तर एकमताने निर्णय घेऊ अशी भूमिका सुद्धा कार्यकर्त्यांनी मांडली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर खासदार उदयनराजे भोसले यांनी आज (16 मार्च) सूचक प्रतिक्रिया देताना पुन्हा एकदा संभ्रमावस्था वाढवली आहे. त्यामुळे उदयनराजे भोसले यांच्या मनामध्ये आहे तरी काय? अशी चर्चा रंगली आहे. आज उदयनराजे



भोसले यांनी एबीपी माझाशी बोलताना माझ्याकडे तिकीट आहे, प्लेन तिकीट आहे, ट्रेनचं तिकीट आहे, पिक्चरचं तिकीट आहे, बसचं तिकीट आहे, मात्र इतर तिकिटाचं मला काही माहीत नाही असं सुचक विधान केलं. त्यामुळे उदयनराजे हे पहिल्या यादीमध्ये नाव न आल्याने नाराज आहेत का? अशी चर्चा रंगली आहे.

दरम्यान पुढील निर्णयावर आत्ताच बोलणे उचित नसल्याचेही उदयनराजे यावेळी म्हणाले. त्यांनी महायुतीतील जागावाटपावर भाष्य केले. ते म्हणाले की, महायुतीमध्ये तीन पक्ष एकत्र आले आहेत. प्रत्येकाला वाटते की मला तिकीट मिळाले पाहिजे. आणि ते रास्त असून त्यामध्ये चुकीचं काही नसल्याचे सांगितले. त्याचबरोबर मी काही संन्यास घेणार नसल्याचे त्यांनी एक सूचक वक्तव्य यावेळी केले. त्यामुळे सातारा लोकसभेला उदयनराजे वेगळी भूमिका घेणार का? अशी चर्चा रंगली आहे.

दुसरीकडे, सातारा लोकसभेसाठी अजित पवार गट आग्रही आहे. त्यांनी सुद्धा सातारा लोकसभा लढवण्याची इच्छा व्यक्त केली असून या जागेवर दावा केला आहे. अजित पवार गटाकडून रामराजे निंबाळकर यांच्या नावाची चर्चा आहे. त्यामुळे उदयनराजेंचा पत्ता कट होणार का? अशी सुद्धा चर्चा रंगली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून उदयनराजे भाजपमध्ये नाराज आहेत का? अशीही चर्चा रंगली आहे.

दरम्यान भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुद्धा सातारा दौऱ्यामध्ये उदयनराजे भोसले यांच्या उमेदवारीवर कोणतेही स्पष्ट संकेत न दिल्याने कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले आहेत. त्यांनी भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांना सुद्धा घेराव घालत जाब विचारला होता. त्यामुळे राजे यांना उमेदवारी मिळत नसल्याने हा छत्रपतीच्या गादीचा अपमान असल्याची भावना कार्यकर्त्यांची आहे. दरम्यान तीन दिवसांपूर्वी बावनकुळे यांनी साताऱ्यामध्ये भाजप कोअर कमिटीची बैठक घेत सर्वांचे मते जाणून घेतली होती. मात्र उदयनराजेंच्या उमेदवारीवर कोणते स्पष्ट संकेत दिले नव्हते.

# दानवेंना डावलले असते तर ते इथपर्यंत आले असता का? - चंद्रकांत खैरे

प्रतिनिधी
**संभाजीनगर**

मी जर अंबादास दानवेंना डावलले असते तर ते इथपर्यंत आले नसते, ते माझे शिष्य आहेत. मुख्यमंत्र्यांच्या लेव्हलचे विरोधी पक्षनेते असणाऱ्या दानवेंना आणखी काय हवे, असा सवाल ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी उपस्थित केला आहे.

माजी खासदार चंद्रकांत खैरे पुढे बोलताना म्हणाले की, इतके मोठे पद असताना त्यांना लोकसभा का लढवायची आहे?, असा सवाल खैरेंनी उपस्थित केला आहे. 2019 ला माझ्या नशिबात त लोकसभा होती पण राजकीय डावपेचातून मला दूर करण्यात आले. मला अनेक ज्योतिषांनी ही लोकसभा माझ्या नशिबात आहे, असे सांगितल्याचा





दावा चंद्रकांत खैरे यांनी केला आहे.

चंद्रकांत खैरे म्हणाले की, लोकांची ईच्छा आहे की पुन्हा खासदार व्हावे, लोक बोलून दाखवत आहे की तुम्ही नाही म्हणून आम्ही 5 वर्षे मागे गेलो, खासदार जलील यांनी काही काम केले नाही. राज्यसभेचे खासदार प्रभावी नेतृत्व नाही, मी रात्री अपरात्री लोकांची कामे करतो, असा टोला त्यांनी जलील आणि कराडांना लगावला आहे.

चंद्रकांत खैरे म्हणाले की, मी जर अंबादास दानवेंना डावलले असते तर ते इथेपर्यंत आलेच नसते. आपण कुणाचे तोंड बंद करु शकत नाही, मी सर्वांत जेष्ठ आहे. अंबादास दानवे हे माझे शिष्य आहे, गुरू हातचे काही बाकी ठेवतो असे म्हणत त्यांनी सूचक इशारा दिला आहे. तर संजय शिरसाट यांना विचारा की भूकंप कसा होणार असेही त्यांनी म्हटले आहे.

# दुहेरी हत्याकांड; पतीने पत्नी आणि मुलीला संपवलं

प्रतिनिधी
**पुणे**

पुण्याच्या कात्रज परिसराजवळील दत्तनगरमध्ये दुहेरी खूनाचा प्रकार उघडकीस आलाय. घरगुती वादातून पतीने पत्नी आणि मुलीचा खून केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ही घटना शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली असून याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय. दरम्यान खून करणारा स्वतःहून पोलीस ठाण्यात हजर झाल्याची माहिती समोर आलीय.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिलेचे नाव श्वेता तळेवाले वय ४०, शिरोली तळेवाली वय १६ अशी आहेत. तर नराधम पतीचं नाव अजय तळेवाले वय ४५ असे आहे. गेल्या काही दिवसांपासून श्वेता आणि अजय यांच्यात वेळोवेळी भांडण होत होते. आर्थिक वादातून त्यांच्यामध्ये भांडणे व्हायची.

शुक्रवारी रात्रीदेखील या दोघांमध्ये वाद झाले. त्यावेळी पत्नी श्वेताने रागात माहेरी निघून जाणार असल्याचं पतीला सांगितलं. पती-पत्नीमधील वाद निवळल्यानंतर श्वेता झोपी गेली. त्यानंतर संतापलेल्या पतीने श्वेताच्या हाताची नस कापली त्यानंतर उशीने तिचं तोंड दाबून तिचा खून केला. नेहमी आईची बाजू घेणाऱ्या मुलीचादेखील अजयने खून केला. अजय तळेवाले हा फायनान्सची कामे करतो. ग्राहकांना कर्ज मिळवून देण्याचे काम तो करतो. दरम्यान या दुहेरी हत्याकांड प्रकरणाचा तपास भारती विद्यापीठ पोलीस करत आहेत.

पिंपरी चिंचवड शहरात पत्नीने तिच्या सैन्य दलातील प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या घडवून आणल्याची घटना घडलीय. आळंदी पोलीस स्टेशन हद्दीतील चिंबळी येथे ही घटना घडली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील चिंबळी येथे राहुल सुदाम गाडेकर असं हत्या झालेल्या ३६ वर्षीय व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी राहुल सुदाम गाडेकर यांच्या हत्या प्रकरणात पिंपरी चिंचवड शहर पोलिसांच्या गुंडा विरोधी पोलिस पथकाने त्याची पत्नी सुप्रिया राहुल गाडेकर आणि भारतीय सैन्य दलातील प्रियकर सुरेश मोटाभाऊ पाटोळे आणि त्याचा सहकारी रोहिदास नामदेव सोनवणे अशा तिघांना बेड्या ठोकल्या

# 7 जण... सर्व 7 द्या; शेट्टींचा स्वबळावर लढण्याचा नारा

प्रतिनिधी
**कोल्हापूर**

केंद्रीय निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेऊन लोकसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा केली आहे. देशात सात टप्प्यांत मतदान प्रक्रिया पार पडणार असून महाराष्ट्रात पाच टप्प्यांत मतदान होणार आहे. महाराष्ट्रात तिसऱ्या टप्प्यात ७ मे रोजी रायगड, बारामती, धाराशीव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी- सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या मतदारसंघांसाठी मतदान होणार आहे. हातणंगले मतदारसंघातून माजी खासदार राजू शेट्टी हे स्वबळावर निवडणूक लढवणार असून आज निवडणुकीची घोषणा होताच त्यांनी मतदारांना साद घातली आहे.

हातकणंगले मतदारसंघातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेकडून खासदार धैर्यशील माने यांनाच उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. हा मतदारसंघ यापूर्वी भाजपकडे होता. कोल्हापूर



जिल्ह्यातील दोन्ही मतदारसंघ शिवसेनेकडे गेल्यास भाजपला प्रतिनिधित्व मिळत नाही. त्यामुळे उमेदवार शिंदे शिवसेनेचे ठेवून एक जागा कमळ चिन्हावर लढावी, असा आग्रह भाजपकडून सुरू आहे. हा मतदारसंघ यापूर्वी दोनवेळा भाजपने लढवला आहे. त्यावेळी राज्याच्या राजकारणात भाजप फारसा प्रभावी नसतानाही त्यांच्या उमेदवारांनी चांगली मते घेतली आहेत. त्यामुळे खासदार माने यांनी कमळ चिन्हावर लढावे, असा पर्याय येऊ शकतो. स्वत: माने यांनाही त्यातच जास्त रस आहे; परंतु या वाटणीत शिंदे शिवसेनेची एक जागा कमी होते म्हणून ते कितपत तयार होतात यावरच चिन्ह बदलाचा निर्णय होईल.

या मतदारसंघात शेट्टी यांच्या संघटनेचा व भाजपचा एकही आमदार नाही. शिंदे शिवसेनेचा एक आमदार आहे. महाविकास आघाडी व महायुतीकडे प्रत्येकी तीन आमदार आहेत. महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचा मुलगा प्रतीक पाटील यांचे नाव चर्चेत आले होते. त्यांनी काही गावांत संपर्क मोहीमही राबविली होती; परंतु ती नंतर थांबवली. त्यामुळे महाविकास आघाडीचा स्वतंत्र उमेदवार रिंगणात असण्याची शक्यता वाटत नाही. शेट्टी यांच्या उमेदवारीस मुख्यत: शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांचा पाठिंबा जास्त आहे. कारण माने यांचा पराभव हे त्यांचे टार्गेट आहे.

# ‘कहो दिल से, नितीन गडकरी फिर से‘:स्प्रे पेंटिंग करत गडकरींनी फोडला प्रचाराचा नारळ
## नागपुरातून तिसऱ्यांदा निवडणुकीच्या मैदानात

प्रतिनिधी
**नागपूर**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेच्या प्रचार नारळ फोडला आहे. नागपूरमधून नितीन गडकरी तिसऱ्यांदा निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. त्यामुळे शहरात आता प्रचारासाठी ते सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे. भिंतींवर "कहो दिल से, नितीन गडकरी फिर से" अशा आशयाचे स्प्रे पेंटिंग केले जात आहे.

स्वतः नितीन गडकरी यांनी त्यांच्या ट्विटर खात्यावर याचा व्हिडिओ शेअर केला आहे. भाजपतर्फे नितीन गडकरी यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याची जोरदार तयारी भाजपच्या वतीने करण्यात येत आहे. कहो दिल से, नितीन गडकरी फिर से’ अशा आशयाचा मजकूर असलेल्या स्प्रे पेंटिंगचे अनावरण गडकरी यांनी केले आहे.

दरम्यान, बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित भाजपची लोकसभा उमेदवारांची दुसरी यादी जाहीर



झाली. त्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पुन्हा एकदा नागपूरमधून उमेदवारी देण्यात आल्याने नागपूर भाजपमध्ये मोठा आनंद आणि उत्साहाचे वातावरण आहे. नागपूरच्याच गडाचे तिकीट मिळाले असल्याने गडकरींच्या समर्थकांचा जीव भांड्यात पडला आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर नितीन गडकरी यांनी सोशल मीडियावर पंतप्रधान मोदी आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांचे आभार मानले आहेत. नागपूर लोकसभा मतदारसंघातील निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी मागणी देखील नागपूरकरांनी केली आहे.

# तात्या डोक शांत ठेवून निर्णय घ्या...
## आमदार धंगेकरांचा वसंत मोरेंना सल्ला

प्रतिनिधी
**पुणे**

वसंत मोरे यांनी मनसेला सोडचिठ्ठी दिल्यानंतर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, त्यानंतर ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत या दोन्ही नेत्यांच्या वसंत मोरे यांनी भेटी घेतल्या आहे. त्यामुळे वसंत मोरे हे कोणत्या पक्षात जाणार आणि त्यांना पुणे लोकसभा निवडणुकीसाठी कोणता पक्ष लढविण्याची संधी देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.पण या सर्व घडामोडी दरम्यान काँग्रेस पक्षाचे कसबा विधानसभा मतदार संघाचे आमदार रविंद्र धंगेकर यांच्या कार्यालयात जाऊन वसंत मोरे यांनी भेट घेतली. या दोन्ही नेत्यामध्ये जवळपास अर्धा तास चर्चा झाली. रविंद्र धंगेकर आणि वसंत



मोरे हे दोन्ही नेते पुणे लोकसभेसाठी इच्छुक असल्याने, या दोघांच्या भेटीमुळे शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

या भेटीनंतर आमदार रविंद्र धंगेकर म्हणाले की, मागील अनेक वर्षांपासून मी आणि वसंत मोरे राजकीय जीवनात एकत्रित काम करीत आलो आहे. पुणे महापालिकेमध्ये आम्ही दोघांनी राज ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखाली नगरसेवक म्हणून काम केले आहे. पुणे महापालिकेच्या सभागृहात एकत्रित अनेक वर्ष काम केले. त्या काळात मी विरोधी पक्षनेता होतो. तर त्यांनी गटनेता म्हणून काम केले आहे. त्यामुळे आमच्या दोघांचा स्वभाव एकमेकांना चांगला माहिती आहे. तसेच वसंत मोरे यांना सर्व पक्षाकडून निमंत्रण आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन मी राजकीय जीवनातील मोठ्या भावाच्या नात्याने वसंत मोरे यांच्यापेक्षा दोन चार वर्षांनी मोठा असेल ही बाब लक्षात घेऊन वसंत मोरे यांनी डोक शांत ठेवून निर्णय घ्यावा, तसेच आपण ज्या जुन्या पक्षात होता. त्या पक्षावर कधीच टीका करू नका असा मैत्रीचा सल्ला दिल्याचे त्यांनी सांगितले.

# विजयदुर्गच्या डागडुजीसाठी प्रेरणोत्सव समितीने सहकार्य करावे
## - जान्हवीज शर्मा

प्रतिनिधी
**देवगड**

किल्ले विजयदुर्ग प्रेरणोत्सव समितीचे कार्य खरोखरच कौतुकास्पद असून पुरातत्व विभागाच्यावतीने या किल्ल्याच्या डागडुजीसाठी किल्ले विजयदुर्ग प्रेरणोत्सव समितीने सहकार्य करावे अशी अपेक्षा भारतीय पुरातत्व विभागाचे केंद्रीय अतिरिक्त महासंचालक जान्हवीज शर्मा यांनी विजयदुर्ग येथे व्यक्त केली.

शर्मा यांनी शनिवारी विजयदुर्ग किल्ल्याला भेट देऊन संपूर्ण किल्ल्याची पाहणी केली. तत्पूर्वी किल्ले विजयदुर्ग प्रेरणोत्सव समितीच्यावतीने किल्ल्याच्या पायथ्याशी त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रेरणोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष राजीव परुळेकर, उपाध्यक्ष शरद डोंगरे, सचिव बाळा कदम, संचालक प्रदीप साखरकर, गणेश मिठबावकर तसेच माजी उपसरपंच महेश बिडये, गणेश पुजारे आदी उपस्थित होते.

# ज्योती मेटेंना रिंगणात उतरवणार असल्याच्या चर्चा सुरु



प्रतिनिधी
**बीड**

बीड लोकसभा मतदारसंघातून सलग दोनवेळा खासदार असलेल्या प्रितम मुंडे यांना डावलून भाजपने पंकजा मुंडे यांनी उमेदवारी दिली आहे. अजित पवार गटातील मंत्री धनंजय मुंडे देखील महायुतीत असल्याने पंकजा मुंडे यांची बीड लोकसभा मतदारसंघात अधिक ताकद निर्माण झाली आहे. तर दुसऱ्या बाजूला शरद पवारांनी देखील बीड लोकसभा मतदारसंघाबाबत मोठी रणनिती आखली आहे. मराठा आरक्षणासाठी लढा देणारे दिवंगत नेते विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटेंना बीडच्या मैदानात उतरवण्याची चर्चा सुरू आहे.

अलिकडेच बीड लोकसभा मतदारसंघाबाबत शरद पवारांनी बैठक बोलावली होती. त्या बैठकीत शरद पवारांनी बीड लोकसभेवर चर्चा करत नवीन उमेदवार देण्याच्या हालचाली वाढल्या आहेत. बीड लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादीकडून माजी मंत्री जयसिंग गायकवाड, डॉ. नरेंद्र काळे, प्रा. सुशीला मोराळे, ईश्वर मुंडे आदी नेते तयारी करत आहेत. त्यांचे भेटीगाठींचेही सत्र सुरूच आहे. पक्षाऐवजी बाहेरचा चेहरा रिंगणात उतरवायचा व पक्षाची ताकद मागे उभी करायची असे गणित शरद पवारांच्या राष्ट्रवादीत मांडले जात आहे.

दरम्यान, आता शिवसंग्राम पक्षाचे अध्यक्ष विनायक मेटे यांच्या पत्नी डॉ. ज्योती मेटे यांनी शरद पवारांची भेट घेतली आहे. त्यामुळे ज्योती मेटे यांनी बीडची उमेदवारी दिली तर अनेक बदल याठिकाणी होण्याची शक्यता आहे. तसेच हा भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या विरोधात मोठा राजकीय डाव असेल असे बोलले जात आहे.

# विवाह समारंभासाठी आलेल्या एक हजार पाहुण्यांना दिली चक्क पुस्तकांची भेट

## उद्योजक वाल्मीक चव्हाण यांचा उपक्रम

प्रतिनिधी
**संगमनेर**

